रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २३४
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १३ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

लाच घेताना मध्य रेल्वेचा मुख्य अभियंता जाळ्यात/२
वृद्धाचे अपहरण करून लुटमार; दोघांना अटक/५
नवी मुंबईत आमदार चषक क्रिकेट स्पर्धा/८

## ‘देशात पुरेसा इंधन साठा, एलपीजी उत्पादनात वाढ’



**नवी दिल्ली :** केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हरदीप सिंह पुरी यांनी गुरुवारी (दि.१२) लोकसभेत बोलताना मध्यपूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा असल्याची माहिती दिली. ते म्हणाले, जगात सध्या ऊर्जा क्षेत्रात मोठा तणाव निर्माण झाला असला तरी भारताची कच्च्या तेलाची पुरवठास्थिती सुरक्षित आहे. भारत अनेक देशांकडून कच्चे तेल खरेदी करत आहे. ब्लॅक मार्केटिंग रोखण्यासाठीही सरकारने काही महत्त्वाचे उपाय केले आहेत. नव्या नियमानुसार ग्रामीण भागात आता ४५ दिवसांनंतरच एलपीजी सिलेंडर बुक करता येणार आहे, तर शहरी भागात २५ दिवसांचे अंतर ठेवून बुकिंग करता येईल. गेल्या पाच दिवसांत एलपीजी उत्पादनात २८ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. ३३ कोटी भारतीय कुटुंबांच्या स्वयंपाकघरात गॅसची कमतरता भासू नये ही सरकारची प्राथमिकता आहे.

# राजिपच्या अध्यक्षपदी भाजपचे मंगेश वाकडीकर

## राष्ट्रवादीचे मधुकर पाटील उपाध्यक्ष; मान्यवरांकडून शुभेच्छा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे मंगेश रामचंद्र वाकडीकर आणि उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर मारूती पाटील बिनविरोध निवडून आले. राजिपच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा अध्यक्ष निवडून आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी मान्यवरांनी अध्यक्ष, उपाध्यक्षांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजपला १५, राष्ट्रवादी काँग्रेसला १६, शिवसेना शिंदे गटाला २१, शिवसेना ठाकरे गट पाच आणि काँग्रेसला २ जागा मिळाल्या होत्या. यानंतर गुरुवारी (दि. १२) भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदे शिवसेनेने मिळून सत्ता स्थापन केली. त्यामुळे राजिपवर महायुतीची सत्ता आली आहे.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

जिल्हा परिषदेत महायुतीची सत्ता येणार हे निश्चित झाले होते, परंतु अध्यक्ष व उपाध्यक्षपदी कुणाची निवड होते याबाबत सर्वांना उत्सुकता होती. भाजपने अध्यक्षपदासाठी पनवेलचे मंगेश वाकडीकर यांना, तर राष्ट्रवादीने उपाध्यक्षपदासाठी रोह्यातील मधुकर पाटील यांना उमेदवारी दिली.

राजिप अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात गुरुवारी सभा आयोजित करण्यात आली होती. मंगेश वाकडीकर



यांनी अध्यक्षपदाचा आणि मधुकर पाटील यांनी उपाध्यक्षपदाचा अर्ज भरला. यावेळी राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, भाजपचे गटनेते वैकुंठ पाटील, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील, शिवसेनेच्या गटनेत्या मानसी दळवी, दिलीप भोईर, अनंत गोंधळी, विकास गोगावले, चंद्रकांत कळंबे, महेश मोहिते आदी उपस्थित होते.

दुपारी २ वाजता झालेल्या सभेत अपर जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी सुनील थोरवे यांनी राजिपच्या अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर आणि उपाध्यक्षपदी मधुकर पाटील यांची निवड झाल्याचे जाहीर केले. यानंतर कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

दरम्यान, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, रविशेठ पाटील, विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, बाळासाहेब पाटील, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह जि.प. सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही अलिबाग येथे उपस्थित राहून जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर आणि उपाध्यक्ष मधुकर पाटील यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### विकास अन् पारदर्शक कारभारासाठी महायुती कार्यरत –भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

यावेळी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण म्हणाले की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वात येणाऱ्या काळात सर्व जिल्हा परिषदांमध्ये महायुती म्हणून विकासाच्या दृष्टिकोनातून पारदर्शकपणे कारभार व्हावा हे अपेक्षित आहे. त्यासाठी संपूर्ण राज्यात या दिशेने जाण्याचा निर्णय महायुतीकडून घेण्यात आला आहे. त्याचे पहिले पाऊल रायगडात पडले आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीनंतर ज्या विषय समित्या आहेत त्यामध्येही महायुती एकत्रपणे काम पाहणार आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनीही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले. राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये महायुती म्हणून काम करण्याचे बैठकीतील चर्चेत ठरल्यानुसार आज कार्यवाही झाली असून गतिमान कारभार करू, असे सांगितले.

**पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला, तेही कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना जिल्हा परिषद अध्यक्षपदाची संधी दिली. याबद्दल त्यांच्यासह भाजपच्या सर्व नेत्यांचे मी आभार व्यक्त करतो. येत्या काळात रायगड जिल्ह्याला वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न करेन तसेच सर्व सदस्यांच्या सोबतीने जिल्ह्याच्या विकासासाठी कार्यरत राहिन.**
**–मंगेश वाकडीकर,** राजिप अध्यक्ष

# विधानभवन उडवण्याची धमकी देणारा ई-मेल ‘फेक’



## गृहराज्यमंत्र्यांनी केले स्पष्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानभवनासह मुंबईतील चार महत्त्वाच्या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी एका निनावी ई–मेलद्वारे गुरुवारी (दि.१२) सकाळी देण्यात आली. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण असले, तरी प्राथमिक अन्वेषणात हा ‘हॉक्स’ (खोटी धमकी) ई–मेल असल्याचे समोर आले आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि पंकज भोयर यांनी परिस्थिती स्पष्ट करत जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे.

सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी एका मेलद्वारे विधान भवनासह मुंबईतील चार ठिकाणी बॉम्बची धमकी देण्यात आली होती, अशी माहिती विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी दिली. या चार ठिकाणांमध्ये विधान भवन, मुंबई शेअर बाजार, मुंबई मेट्रो, मुंबई उच्च न्यायालय यांचा समावेश आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस दल आणि बॉम्ब शोधक आणि नाशक पथक यांनी तातडीने मोहीम राबवली, तर मुंबई पोलिसांनी संपूर्ण दक्षिण मुंबईत आणि विशेषतः विधानभवन परिसरात सर्च ऑपरेशन राबवले. विधानभवनाच्या सर्व प्रवेशद्वारांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या संदर्भात गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, विधीमंडळ उडवून देण्याची धमकी मिळणे ही वस्तुस्थिती आहे, परंतु हा प्रशासनाचे लक्ष विचलित करण्याचा एक खोटा प्रयत्न (हॉक्स) आहे. भारताचे जागतिक स्तरावरील वाढते वलय पाहता मिसाईल आक्रमणाची शक्यता अत्यंत अल्प आहे. कोणत्याही राजकीय घटनेशी किंवा आखाती देशांतील युद्धाशी याचा संबंध जोडणे चुकीचे ठरेल. विधानभवन पूर्णपणे सुरक्षित आहे.

गृहराज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, देशात आणि राज्यात शांतता असताना काही विकृत व्यक्ती वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र गृहविभागाच्या तत्परतेमुळे हे कारस्थान हाणून पाडण्यात आले आहे. विधानभवनाच्या सर्व प्रवेशद्वारांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून प्रत्येक व्यक्तीची कसून पडताळणी केली जात आहे. हा ई–मेल कोठून आला याचा शोध सायबर सेल आणि पोलीस यंत्रणा घेत आहेत.

## निवडक

### जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला थोडक्यात बचावले

**श्रीनगर :** नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि जम्मू–काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांच्यावर बुधवारी रात्री एका व्यक्तीने गोळीबार करण्याचा प्रयत्न केला, पण सुरक्षारक्षकांच्या सतर्कतेमुळे हल्लेखोर लगेच पकडला गेला. फारूख अब्दुल्ला सुरक्षित असून त्यांना काहीही इजा झाली नाही. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी या हल्ल्यात चौधरी किरकोळ जखमी झाले आहेत.

### युद्धसंघर्षामुळे केंद्राकडून उच्चस्तरीय समिती स्थापन

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तीन सदस्यीय उच्चस्तरीय मंत्रीगटाची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्ष केंद्रीय गृहमंत्री अमित शाह असून परराष्ट्रमंत्री एस जयशंकर आणि पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांचाही समितीत समावेश आहे. संभाव्य ऊर्जा संकटाचा भारतावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी हा मंत्रीगट विविध स्तरांवर परिस्थितीचे निरीक्षण करून इतर मंत्रालयांसोबत समन्वय साधेल.

## देशाची बदनामी करणाऱ्यांना जनता ओळखते –उपमुख्यमंत्री शिंदे



**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पातळीवर इराण विरुद्ध इस्राईल आणि अमेरिका यांच्यात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस किंवा इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी केंद्र सरकार अत्यंत बारकाईने परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर खरमरीत शब्दांत टीका केली.

मुंबई येथे पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील प्रत्येक परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. आंतरराष्ट्रीय तणावामुळे देशातील नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करीत आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.

यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, संसद सुरू असताना राहुल गांधी नेहमी परदेश दौऱ्यावर असतात. देशाच्या संसदेत चर्चा करण्याऐवजी ते परदेशात जाऊन भारताची बदनामी करण्याचे काम करतात. प्रत्येक वेळी संसद अधिवेशनाच्या काळात दुसऱ्या देशात जाऊन भारताविरोधात बोलण्याची त्यांची सवयच झाली आहे. देशाची प्रतिमा खराब करणारी वक्तव्ये करून पाकिस्तानसारख्या देशांना मथळे मिळवून देण्याचे काम ते करत आहेत.

भारताची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर पोहचली असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर जाणार आहे. देश वेगाने प्रगती करत असताना काही लोकांना त्याची पोटदुखी होत आहे. देशाच्या विकासासाठी विधायक काम करण्याऐवजी देशाची बदनामी करणाऱ्यांना जनता योग्य वेळी उत्तर देईल, अशी बोचरी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली.



## सौदीहून तेलाचे जहाज मुंबईत दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

सौदी अरेबियाहून कच्चे तेल घेऊन येणारे व लायबेरियाचा झेंडा लावलेले जहाज होर्मुझ स्ट्रेट यशस्वीरित्या पार करून मुंबईत पोहचला आहे. या जहाजाचा कॅप्टन भारतीय होता.

इराणवरील अमेरिका आणि इस्रायली हल्ल्यानंतर स्ट्रेट होर्मुझमधील वाहतूक ठप्प झाली आहे. यादरम्यान भारतात पोहचणारे हे पहिले जहाज ठरले आहे. टँकर शेनलॉन्ग स्वेजमॅक्सने १ मार्च रोजी सौदीच्या रास तनुरा पोर्टहून कच्चे तेल लोड केले होते. ३ मार्च रोजी हे जहाज भारताच्या दिशेने रवाना झाले. त्याचे शेवटचे लोकेशन होर्मुझची सामुद्रधुनी होती. त्यानंतर अचानक हे जहाज रडारवरून गायब झाले. सूत्रांनुसार या खतरनाक क्षेत्रातून प्रवास करताना जहाजाने वेळ आणि ट्रॅकिंग लपवण्यासाठी ट्रान्सपोंडर आणि एआयएस सिस्टम बंद केली होती. गनिमी काव्याचा वापर करून हे जहाज पुन्हा ९ मार्च रोजी ट्रॅकिंग डेटाबेसवर दिसले आणि ११ मार्चला सुरक्षितपणे मुंबईला पोहचले आहे.

## खेळाडूंना पाच टक्के आरक्षणासाठी क्रीडा ई–प्रमाण प्रणाली कार्यान्वित

### २४ तासांत डिजिटल पडताळणी प्रमाणपत्र



**मुंबई : प्रतिनिधी**

गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये पाच टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा ई–प्रमाण ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली सुरू केली असल्याची माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने दिली आहे.

या प्रणालीद्वारे खेळाडूंना डिजिटल पडताळणीसह प्रमाणपत्र मिळणार आहे. यावर असलेल्या क्यूआर कोडमुळे प्रमाणपत्राची सत्यता संबंधित नियुक्ती प्राधिकरण त्वरित तपासू शकतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंनी क्रीडा ई–प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे.

खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन क्रीडा ई–प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे, त्याचप्रमाणे जर एखाद्या खेळाडूची माहिती प्रणालीवर उपलब्ध नसल्यास supportkridaepramaan.org या ई–मेलवर स्पर्धेचे नाव, वर्ष आणि प्रमाणपत्राची स्कॅन प्रत पाठवून तक्रार नोंदवता येईल. त्यानंतर विभागस्तरावर पडताळणी करून अभिलेख पोर्टलवर अद्ययावत करण्यात येतील.

सद्यस्थितीत कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्युडो (२०२४) आणि कुराश (२०२४–२५ व २०१७–१८) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध असून संबंधित खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. इतर खेळांचे अभिलेखही टप्प्याटप्प्याने अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

## पनवेलमध्ये ‘गूज मनीचे’ नाट्यप्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संस्कृतीतील अजरामर महाकाव्ये असलेल्या रामायण आणि महाभारतातील नायिकांच्या अंतर्मनाचा वेध घेणारा ’गूज मनीचे’ हा संशोधनाधारित आणि प्रयोगशील नाट्यप्रयोग बुधवारी (दि.११) पनवेलमध्ये उत्साहात सादर झाला. नादकला थिएटर ॲण्ड फिल्म्स निर्मित या अभिनव नाटकाचा शुभारंभ आणि पहिला प्रयोग आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या विशेष नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

’गूज मनीचे’नाट्यप्रयोगाची मूळ संकल्पना डॉ. मेधा किरीट सोमय्या यांची असून लेखन व





दिग्दर्शन साक्षी परांजपे यांनी केले आहे, तर प्रिया सावंत या प्रयोगाच्या सहनिर्मात्या आहेत. रामायण आणि महाभारतातील चिरंतन नायिकांचे विचार, त्यांच्या भावना आणि त्यांचे अंतर्मन आजच्या काळाशी सुसंगत पद्धतीने या प्रयोगातून अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आले. हा प्रयोग केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून एक सखोल संशोधनावर आधारित नाट्यकृती असल्याने प्रयोगापूर्वीच रसिक प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. प्रत्यक्षात प्रयोगादरम्यान नायिकांच्या व्यक्त होणाऱ्या भावनांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

या प्रयोगावेळी माजी खासदार किरीट सोमय्या, मेधा सोमय्या, प्रिया सावंत, साक्षी परांजपे, अभिषेक पटवर्धन, शामनाथ पुंडे, चिन्मय समेळ, वैभव बुवा, आदित्य उपाध्ये, निखील गोरे, अमोल खेर, सुनीता खरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या यशस्वी आयोजनासाठी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांचे आयोजकांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

## उन्हाळी सुट्ट्यांसाठी विशेष रेल्वेगाड्या धावणार

**रोहा : प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने १४८४ उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. या विशेष गाड्यांमध्ये ७४९ आरक्षित, तर ७३५ अनारक्षित गाड्यांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रवाशांना सुट्ट्यांमध्ये आपल्या कुटुंबीय व नातेवाईकांसोबत वेळ घालवण्यासाठी सुलभ प्रवास करता यावा यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. या उन्हाळी विशेष गाड्यांमध्ये मागणीनुसार आधीपासून सुरू असलेल्या काही गाड्यांसोबतच



अतिरिक्त विशेष गाड्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी मुंबई/दौंड–सोलापूर, पुणे–कोल्हापूर, नाशिक रोड–बडनेरा तसेच हडपसर–हरंगुळ या मार्गांवर विशेष रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्राबाहेरील प्रवासासाठी मुंबई–बलिया, मुंबई–गोरखपूर, दौंड–कलबुरगी तसेच सोलापूर–कलबुरगी/अनकापल्ली या मार्गांवरही विशेष गाड्या धावणार आहेत.

या विशेष गाड्यांमुळे प्रवाशांना आपल्या प्रवासाचे नियोजन अधिक सोयीस्करपणे करता येणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने प्रवासी सुविधांमध्ये वाढ केली असून नेटवर्कमध्ये विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. या विशेष गाड्यांच्या वेळापत्रक व थांब्यांची सविस्तर माहिती मध्य रेल्वेकडून लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# पामबीचवरील भुयारी मार्गासाठी ३२९ वृक्षांचे होणार स्थलांतरण



जास्तीत जास्त बाधित झाडांचे केले जाणार पुनर्रोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता, सानपाडा आणि जुईनगर परिसरातील नागरिकांना शहराबाहेर पडताना होणाऱ्या वाहतूक कोंडीतून दिलासा मिळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने पामबीच मार्गालगत सेक्टर १९, सानपाडा येथे पर्यायी मार्ग स्वरुपात अंडरपास बांधण्याचे नियोजन केलेले आहे. हा प्रकल्प सद्यस्थितीत प्रगतीपथावर असून, विकासकामासोबतच पर्यावरणाचे रक्षण करण्याला महापालिकेमार्फत सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.

सानपाडा से.१९ पामबीच मार्गावर केसर सोलिटेअर इमारती जवळ अंडरपास तयार करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे. संपूर्ण सानपाडा नोडमध्ये पामबीच मार्गावरुन प्रवेश करण्याकरिता मोराज सर्कल जवळ एकमेव मार्ग आहे. सद्यस्थितीत नागरिकांची व वाहनांची वाढती संख्या, नजीकचे आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटीचे विस्तारीकरण तसेच नियोजित तिसरी मुंबई अशा विविध प्रकल्पांमुळे पामबीच मार्गावरील वाहतुकीवर मोठया प्रमाणात ताण येणार आहे. परिणामी वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. त्या अनुषंगाने वाहतूक नियमनाच्या सर्व बाबी तपासून तांत्रिक सल्लागारांमार्फत बेलापूर, उरण कडील तसेच वाशी मार्ग व मुंबई दिशेने जाणा–या वाहनांची रहदारी सुलभ होण्याच्या दृष्टीने सदर भुयारी मार्ग सुचित करण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या क्षेत्रात एकूण ८०८ वृक्षांची नोंद करण्यात आली होती. त्या वृक्षांपैकी ३६८ वृक्षांना कोणताही धक्का न लावता, ते आहे त्याच ठिकाणी जतन केले जाणार आहेत. तसेच प्रकल्पासाठी अनिवार्य असलेल्या ४४० वृक्षांपैकी ३२९ वृक्षांचे शास्त्रीय पद्धतीने त्याच परिसरात पुनरोपण केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने आंबा, चिंच, आवळा, जांभूळ, रामफळ, पुत्रनजिवा आणि गुलमोहर यांसारख्या महत्त्वाच्या वृक्ष प्रजातींचा समावेश आहे. या प्रकल्पात संपूर्ण बाधीत होणा–या वृक्षांमध्ये केवळ १११ वृक्ष काढले जाणार आहेत. त्यापैकी ९२ झाडे ही वृक्ष तज्ज्ञांच्या मते जैवविविधतेच्या दृष्टीने तितकीशी महत्वाची नसणा–या 'सुबाभूळ' या प्रजातीची आहेत.

सदर वृक्षांबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी वृक्ष प्राधिकरणामार्फत या प्रक्रियेसाठी जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांच्या हरकती मागवण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ४७ हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्यांची सुनावणी वृक्ष अधिकारी (तुर्भे) यांच्याकडे आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीप्रसंगी ११ नागरिक उपस्थित होते. सदर नागरिकांचे म्हणणे संपूर्ण ऐकून घेण्यात आले. या शिवाय अनुपस्थित राहिलेल्या नागरिकांशी वृक्ष अधिकारी, तुर्भे यांनी संपर्क साधला असता, अनेक नागरिकांनी आपण कोणतीही हरकत घेतली नसल्याचे व या विषयी कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे काही हरकतींबाबत संभ्रम असल्याचेही निदर्शनास आले आहे.

सानपाडा अंडरपास हा प्रकल्प नागरिकांचा वेळ वाचवण्यासाठी आणि इंधन बचतीसाठी महत्वाचा आहे. यामध्ये नागरिकांच्या सुविधेसोबतच पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा समतोल साधण्याचा महानगरपालिका प्रयत्न करीत आहे. याकरिता प्रकल्पासाठी बाधीत होणा–या जास्तीत जास्त झाडांचे पुनरोपण करण्यात येत आहे. तरी नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शहराच्या विकास प्रकल्पासाठी सहकार्य करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# ४० लाखांची लाच घेताना मध्य रेल्वेचा मुख्य अभियंता सीबीआयच्या जाळ्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेतील भ्रष्टाचारावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने मोठी कारवाई करत ४० कोटींच्या कंत्राटासाठी ४० लाखांची लाच मागणाऱ्या मुख्य विद्युत वितरण अभियंत्याला रंगेहाथ अटक केली. या प्रकरणात दोन खासगी इसमांनाही ताब्यात घेण्यात आले असून मुंबई, नवी मुंबई आणि कर्जत येथील ठिकाणांवर छापे टाकून तब्बल १ कोटी ४७ लाखांची रोकड व दागिने जप्त करण्यात आले.

मध्य रेल्वेकडून विविध कामांसाठी ४० कोटींच्या कंत्राटाची निविदा काढण्यात आली होती. हे कंत्राट मंजूर करण्यासाठी संबंधित मुख्य अभियंता रमेश कुमार चौवे यांनी कंत्राट रकमेच्या १ टक्का म्हणजेच ४० लाख रुपयांची लाच मागितल्याची माहिती सीबीआयला मिळाली होती.

सीबीआयने याबाबत सापळा रचत लाचेचा १० लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना चौवे यांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत अंशुल वर्मा आणि कनाय वर्मा या दोन खासगी इसमांनाही अटक करण्यात आली.या अटकेनंतर सीबीआयने मुंबईतील कार्यालयासह नवी मुंबई आणि कर्जत येथील पाच ठिकाणी छापे टाकले. छाप्यात चौवे यांच्या कार्यालयातून आणि घरातून मोठ्या प्रमाणात रोकड व दागिने सापडले. कार्यालयात ३.८५ लाखांची रोकड, तर निवासस्थानी ९०.७९ लाखांची रोकड, २४१ ग्रॅम सोने आणि २५७७ ग्रॅम चांदी असा सुमारे ४२.५२ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला.देशभरात आणखी मालमत्ता असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील मध्य रेल्वेच्या कार्यालयातही पुढील तपास सुरू असून अधिक कागदपत्रांची छाननी केली जात आहे.

# भाजप माजी जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांची पक्षविरोधी कारवायांबद्दल गच्छंती

**पाली : प्रतिनिधी**

पक्षविरोधी कारवाया केल्याचा आणि संघटनेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व खासदार धैर्यशिल पाटील यांनी माजी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश शरद मपारा यांची पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांवरून तात्काळ प्रभावाने हकालपट्टी केली आहे.



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीदरम्यान राजेश मपारा यांनी पक्षाच्या अधिकृत धोरणांविरुद्ध काम केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. भाजपने या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मपारा यांनी या निर्णयाला विरोध दर्शवत, पक्षाच्या मान्यतेशिवाय 'स्थानिक संघर्ष आघाडी' स्थापन केली आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोबत घेऊन अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

सुधागड तालुक्यातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मपारा यांच्या विरोधात लेखी तक्रार केली होती. मपारा हे सातत्याने पक्षाचे नुकसान होईल असे वर्तन करत असून, त्यांनी शेकाप, काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांच्याशी हातमिळवणी करून भाजप उमेदवारांचा पराभव करण्यासाठी प्रयत्न केले, असा आरोप निवेदनात करण्यात आला होता. या तक्रारीवर सुधागड तालुक्यातील अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.

# घरगुती गॅसपुरवठा नियमित; अफवांवर विश्वास ठेवू नये –तहसीलदार

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी गॅस टंचाईबाबत पसरत असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये आणि संयम राखावा, असे प्रेस नोट द्वारे नागरिकांना आवाहन रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांनी केले आहे. सध्या जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी घरगुती गॅसबाबत अफवा पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र रोहा तालुक्यात घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा नियमित सुरू असून कोणतीही अडचण निर्माण झालेली नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

घरगुती वापरासाठी वितरित करण्यात येणारा एलपीजी गॅस केवळ घरगुती कारणांसाठीच वापरणे बंधनकारक आहे. काही ठिकाणी घरगुती गॅसचा व्यावसायिक अथवा अनधिकृत वापर होत असल्याचे आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार तसेच तेल विपणन कंपन्यांच्या नियमांनुसार घरगुती एलपीजी सिलेंडर बुकिंगमध्ये किमान २५ दिवसांचा कालावधी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एका सिलेंडरचे वितरण झाल्यानंतर २५ दिवस पूर्ण झाल्यानंतरच पुढील सिलेंडर बुक करता येतो. तालुक्यातील सर्व गॅस वितरकांना बुकिंगनंतर नियमानुसार लवकरात लवकर ग्राहकांना सिलेंडर वितरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.नागरिकांनी घरगुती गॅसचा अनावश्यक साठा करून ठेवू नये तसेच अफवांवर विश्वास ठेवून घाईगडबडीत गॅस घेण्याचा प्रयत्न करू नये. घरगुती गॅसचा पुरवठा नियमित सुरू असून नागरिकांनी शांतता राखून नियमानुसार गॅसचा वापर करावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांनी केले आहे.

# खोपोली उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या दालनात बैठक

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीचे उपनगराध्यक्ष यांच्या दालनात विक्रम साबळे यांच्या अध्यक्षतेखाली पाणीपुरवठा, उद्यान, व विद्युत विभागासंदर्भात महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली

खोपोली शहरात सध्या उन्हाळ्यात पाणीटंचाईचे झळ नागरिकांना बसू नये यासाठी प्रशासनाने स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा करावा त्याप्रमाणे नागरिकांनीही पाणी जपून वापरावे अशा महत्त्वपूर्ण सूचना केल्या , काही प्रभागात हातपंप बसवण्याबाबत निर्णय घेण्यात आला, त्याचप्रमाणे अनेक उद्यानांची दुरवस्था होत असल्याने त्याची दुरुस्ती व अनेक विविध प्रकारच्या झाडांची लागवड करणे, व पाणीपुरवठा बाबत सर्व नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा व वेळेवर होण्याबाबत चर्चा झाली.

या सभेला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी योग्य ते मार्गदर्शन केले. नागरिकांना पुरेसे पाणी देणे आमचे कर्तव्य आहे व प्रशासन याबाबत सज्ज आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा. या वं अनेक सूचना यावेळी केल्या या सभेला डॉ सुनील पाटील, दिनेश थोरव, श्रुती पालांडे, ऐश्वर्या पाटील, तसलीम पटेल इत्यादी नगरसेवकांसह पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख अविनाश भोईर, अभियंता तेजस कराळे, उद्यान अधीक्षक निलेश लोखंडे, व विद्युत विभागाचे अधिकारी या बैठकीला हजर होते. उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी घेतलेल्या अनेक धाडसी निर्णयाबाबत सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

# विशेष आरोग्य तपासणी शिबिराचा महिला स्वच्छताकर्मींनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**



स्वच्छ भारत मिशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला केंद्रीत स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महिलांना सहभागी करुन घेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

त्यानुसार आज नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात महिला स्वच्छता कर्मचा–यांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी, कान,नाक,घसा तपासणी, नेत्र तपासणी, पॅथोलॉजी, रक्त तपासणी अशाप्रकारे ४५० हून अधिक महिला स्वच्छताकर्मींची आरोग्य तपासणी करण्यात आली व त्यांना आवश्यकतेनुसार औषधे देण्यात आली तसेच अधिक तपासणीची गरज जाणवलेल्या महिला स्वच्छताकर्मींना महानगरपालिका रुग्णालयात संदर्भीत करण्यात आले.

यावेळी आयोजित रक्तदान शिबीरात ५० हून अधिक नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांनी सेवाभावी दृष्टीने रक्तदान केले. नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी आरोग्य शिबीराच्या ठिकाणी भेट देत कामकाजाची पाहणी केली.

# मुरूड ग्रामीण रुणालयात मोफत डायलिसीस सेवेचा लोकार्पण सोहळा




**मुरुड : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य कुटूंब कल्याण विभागांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक रायगड , नॅचरल गॅस नियामक मंडळ भारत सरकार चेअरमन तथा रायगडचे खासदार व हिंदुस्थान लाईफ केअर लि . यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड ग्रामीण रुग्णालयात मोफत डायलिसीस सेवेचा लोकार्पण सोहळा दि .१० मार्च रोजी माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी मुरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर , जिल्हा शल्य चिकित्सक डॉ निशिकांत पाटील , वैद्यकीय अधिक्षक डॉ . उषा चौले , माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर , नगरसेवकमनोज भगत , आदेश दांडेकर , रुपेश पाटील, तमीम ढाकम , राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, भाई सुर्वे , संजय गुंजाळ , अजित कासार , आदी मान्यवर उपस्थित होते .

प्रास्ताविक करताना डॉ .उषा चौले म्हणाल्या की,खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्याने मुरुड आणि परिसरातील रुग्णांना चांगल्या दर्जाची डायलिसीस सेवा ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून दिली जाईल अशी ग्वाही दिली .यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,अलिकडे मधुमेह व उच्च रक्त दाब असलेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे .

त्यामुळे खासदार सुनील तटकरे यांनी सीएस आर फंडाचा विनियोग समाजमंदीरे वा इमारती उभारण्या इतकेच मुरुडकर जनतेच्या डायलेसीस रुग्णांना उद्भवणाऱ्या विकारावर मात करण्यासाठी गेल कंपनीच्या माध्यमातून ५ अत्याधुनिक डायलेसिस मशीन्स मंजूर करून एच . एल . एल कंपनी कडून प्रशिक्षित व अनुभवी टेक्निशियन उपलब्ध करून दिले आहेत . तसेच एक मशिन स्पेअर ठेवले आहे . या सेवेचा लाभ घेण्यासाठी १९ रुग्णांची नोंद ही झाल्याचे सांगितले . उत्तम प्रतीची डायलाझर ची सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे . तेंव्हा तालुक्या सह दीघी , आदगाव व म्हसळा तालुक्यातील रुग्णांनी या विनामूल्य सेवेचा लाभ अवश्य घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

# खारपाडा येथील चोरीचा पर्दाफाश; दोन अल्पवयीन आरोपी अटकेत

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारपाडा गावात घरात घुसून महिलेला बांधून जबरी चोरी केल्याच्या प्रकरणाचा पेण पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात दोन अल्पवयीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून सुमारे १ लाख १२ हजार ४०० रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे

मिळालेल्या माहितीनुसार, खारपाडा गावातील अर्चना गजानन घरत यांच्या घरात दोन इसमांनी जबरदस्तीने प्रवेश करून त्यांना ढकलून त्यांच्या साडीने तोंड व मान बांधली. त्यानंतर घरातील सुमारे १ लाख १२ हजार ४०० रुपयांचे सोन्याचे दागिने दागिने जबरीने चोरी करून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच पेण पोलिस ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, खारपाडा आणि दुष्मी गावातील ग्रामस्थांनी एका संशयिताला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

पोलिसांनी पकडलेल्या संशयिताकडून चोरीचे दागिने पंचनामा करून जप्त केले. चौकशीदरम्यान हा संशयित अल्पवयीन असून त्याचा आणखी एक साथीदार पनवेलच्या दिशेने पळून गेल्याची माहिती समोर आली. यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोधमोहीम राबवून दुसऱ्या संशयितालाही नवी मुंबई मधील दहिसर मोरी परिसरातून ताब्यात घेतले. तपासात तोही अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले.

दोन्ही विधीसंघर्षीत बालकांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना पुढील कार्यवाहीसाठी कर्जत येथील निरीक्षणगृहात ठेवण्यात आले आहे. या गुन्ह्यातील चोरीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

# गॅसच्या तुटवड्यामुळे ग्रामीण भागातही हॉटेल व्यवसायावर परिणाम; चुलीचा पर्याय

**चौक : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील हॉटेल मध्ये खाद्य पदार्थ बनविण्यासाठी गॅस सिलिंडर तुटवडा जाणवत असून त्याचा परिणाम छोट्या हॉटेल व्यावसायिक यांना होताना दिसत आहे.

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यामध्ये गेले काही दिवसांपासून भयंकर युद्ध सुरूच आहे. आखाती देशांमध्ये युद्धाची आग धुमसत असल्याने येथून भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, नैसर्गिक वायू आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला असून जनता आता गॅसवर आहे. याचा जास्त फटका खाद्य पदार्थ बनवणारे छोटे व्यावसायिक यांना बसताना दिसत असून ग्रामीण भागातील चहा,वडापाव विकणारे यांनी व्यवसाय बंद ठेवला आहे. यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त होणार आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर भविष्यात हॉटेल व्यवसायिक तसेच गृहिणी पुन्हा चुलीकडे वळतील अशी चिन्हे आहेत.

एक वेळ ग्रामीण भागात चूल फुंकता येईल, पण शहरात काय?आणखी युद्ध सुरु राहिल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर स्वरुप धारण करु शकते.

# खालापूर सभापती, उपसभापतींसह जि.प.,पं.स. सदस्यांचा जाहीर सत्कार



## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची उपस्थिती

**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

खालापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी कृष्णाशेठ पारंगे आणि उपसभापतीपदी रामदास ऊर्फ भाई शिंदे यांची निवड झाल्यानंतर वासांबे परिसरातील जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांचा मोहोपाडा येथील अचानक मैदानावर बुधवारी (दि. ११) सायंकाळी जाहीर सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या मेळाव्यास महायुतीच्या विजयाचा जल्लोष करत कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. ढोल-ताशे, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणा देत सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यास भाजपचे प्रदेश चिटणीस व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जि.प. सदस्य मोतीरामशेठ ठोंबरे, सुधीरशेठ ठोंबरे, माजी सरपंच लक्ष्मणशेठ पारंगे, भूषणशेठ पारंगे, सचिन तांडेल, ताई पवार, वासांबे विभाग अध्यक्ष राकेश खारकर, हभप विनायकमहाराज कांबेकर, आकाश जुईकर, महादेव गडगे यांच्यासह इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील पनवेल, खालापूर, सुधागड आणि पेण या चार तालुक्यांमध्ये भाजपचे सभापती निवडून आल्याने हा पक्षासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार विकासाच्या कामांना गती देत आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून या योजना गावागावात पोहचविण्याची जबाबदारी आता नवनिर्वाचित सदस्यांवर आहे.

२०१९पासून आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली असून गावागावात विकास पोहचला आहे. कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळेच हा विजय शक्य झाला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उरणचे आमदार महेश बालदी यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ही निवडणूक सोपी नव्हती. अनेक अडथळे आणि आव्हानांचा सामना करत कार्यकर्त्यांच्या विश्वासावर हा विजय मिळवण्यात आला आहे. शिवचरित्रातील एक वाक्य नेहमी लक्षात ठेवावे, वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही आणि वेडी माणसं इतिहास घडवतात. हा इतिहास कार्यकर्त्यांच्या विश्वासामुळेच घडला.

वासांबे परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असून आदिवासी बांधवांसाठी घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार आहेत. यंदा चार हजार घरकुलांची कामे सुरू झाली असून उर्वरित लाभार्थ्यांनाही न्याय दिला जाईल, असेदेखील त्यांनी स्पष्ट केले.

नवनिर्वाचित सभापती कृष्णाशेठ पारंगे यांनी जनतेने दिलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत विकासकामांना प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. वासांबे परिसरातील विविध समस्या सोडविण्यासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून ठोस पावले उचलली जातील. परिसरात येणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांकडून स्थानिक नागरिकांना आवश्यक सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

पूर्वी एचओसी कंपनीने परिसरात हॉस्पिटल, क्रीडांगण, समाजमंदिर यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्याच धर्तीवर बीपीसीएलकडूनही अशा सुविधा मिळाव्यात यासाठी सरकारकडे मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनतेने दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि पंचायत समितीच्या सर्व सदस्यांसह वासांबे परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी काम केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मतदार व कार्यकर्त्यांना दिलेला शब्द व विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे सांगून उपसभापती भाई शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित करत साऱ्यांचेच आभार व्यक्त केले तसेच आम्ही तालुक्याच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध राहू, असे आश्वासन दिले.

पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनीही सर्व कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवत मतदारांपर्यंत पोहचून पक्षाला मिळून दिलेले हे यश कौतुकास्पद असल्याचे नमूद करून कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचे विशेष कौतुक केले.

यावेळी सभापती कृष्णाशेठ पारंगे, उपसभापती रघुनाथ भाई शिंदे, जिल्हा परिषद सदस्य नेहा भूषण पारंगे, पंचायत समिती सदस्य अर्चना भोईर, गौरी गडगे या सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्याला पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेल : रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून मंगेश वाकडीकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना कामगार नेते सुधीर घरत, चंद्रकांत घरत, सीमा घरत, सुप्रिया म्हात्रे, भगवान घरत.

## रस्त्यावर नोटा टाकून ५० हजार लुटले

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यावर नोटा पडल्याचे सांगून त्या उचलण्यासाठी गेलेल्या रिक्षाचालकाची ५० हजारांची रोकड चोरट्यांनी पळवली. या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात अज्ञात दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

लालचंद्र पाटील (वय ४९) सकाळी बँकेतून ५० हजारांची रोकड काढून ते रिक्षाने घराकडे चालले होते. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोघांनी त्यांना रस्त्यावर नोटा पडल्याचे सांगितले. त्यामुळे पाटील यांनी रिक्षा थांबवून मागे पाहिले असता काही अंतरावर १०, २० व ५०, १०० रुपयांच्या नोटा दिसून आल्या. रस्त्यावर पडलेल्या त्या नोटा आपल्याच असाव्यात असे समजून ते नोटा उचलायला गेले. त्याचवेळी त्यांनी बँकेतून काढलेली व रिक्षात ठेवलेली ५० हजारांची रोकड व त्यासोबत १० लाखांच्या एफडीचे पेपर व बँकेचे पासबुक, चेकबुक चोरट्यांनी पळवले. रस्त्यावर पडलेल्या नोटा उचलून ते रिक्षाकडे आल्यानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

## कामोठ्यात गांजा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील एका टपरीचालकाकडे ४० हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.२३ वर्षीय टपरीचालकाचे नाव सावन साहु असे आहे.

सावन हा नौपाडा गावात राहत होता. कामोठे पोलीस ठाण्यात याबाबत सावन याच्यावर अमलीपदार्थ विक्रीसाठी स्वतः जवळ बाळगल्याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कामोठे येथील सेक्टर २१ येथील न्यू आरती मेडिकल दुकानासमोरील चौकात मध्यरात्री कारवाई कामोठे पोलिसांनी केली.

## महिलेची सोनसाखळी चोरली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, खांदेश्वर, करंजाडे व कळंबोली या परिसरांत महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावण्याच्या घटनांनंतर आता मोटारीत बसलेल्या महिलांनाही चोरट्यांनी लक्ष्य करण्यास सुरुवात केल्याचे समोर आले आहे.

कळंबोलीत मोटारीत बसलेल्या एका गृहिणीच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपयांची सोनसाखळी चोरट्याने हिसकावून नेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कळंबोली परिसरातील सेक्टर २० मधील प्रिस्टोन इमारतीलगत असलेल्या उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळ ही घटना घडली.

रात्री सुमारे पावणेनऊ वाजण्याच्या सुमारास संबंधित महिला आपल्या मोटारीत बसून मोबाइलवर व्हिडिओ पाहत होती. त्या वेळी सुमारे २५ ते २८ वर्षे वयोगटाचा एक अनोळखी तरुण त्यांच्या मोटारीजवळ आला. या तरुणाने त्या महिलेचा मोबाइल क्रमांक मागितला. संशय आल्याने संबंधित महिलेने पतीला फोन करण्याचे सांगत मोटारीच्या काचा वर करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचवेळी त्या तरुणाने महिलेच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून घेतली.




## संपादकीय

# सुटका करणारा निकाल

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने एका कुटुंबाला त्यांच्या मुलाला सन्मानाने मृत्यू देण्याची, निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी नुकतीच दिली. न्यायालयाने अतिशय संवेदनशीलतेने आणि आवश्यक ती हरतऱ्हेची दक्षता घेऊन हा ऐतिहासिक निर्णय दिला असून केंद्र सरकारला पॅसिव्ह युथनेशियावर व्यापक कायदा बनवण्याबाबत विचार करण्यास देखील सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे.

**देशाच्या इतिहासात सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी पहिल्यांदाच 'पॅसिव्ह युथनेशिया' म्हणजे निष्क्रिय इच्छामरणाला परवानगी दिली. १३ वर्षांहून अधिक काळ कोमामध्ये असलेल्या ३२ वर्षांच्या हरीश राणा याची जीवरक्षक उपकरणे (लाइफसपोर्ट) हटवण्यास न्यायालयाने आपल्या निकालपत्रात मंजुरी दिली. मात्र याला कोणत्याही प्रकारे 'सक्रिय इच्छामरण' म्हणू नये यावर न्यायालयाने भर दिला आहे. सक्रिय इच्छामरण म्हणजे एखाद्या व्यक्तीचे जीवन संपवण्यासाठी प्राणघातक इंजेक्शन देणे. हरीश राणा नावाचा हा तरुण पंजाब विद्यापीठात बी.टेक.चे शिक्षण घेत असताना ऑगस्ट २०१३ मध्ये आपल्या पेइंग गेस्ट निवासाच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. त्यावेळी मेंदूला गंभीर दुखापत होऊन हरीश कायमच्या कोमा अवस्थेत गेला. तेव्हापासून गेली १३ वर्षे अंथरुणाला खिळलेला हरीश आज ३२ वर्षांचा आहे. हा संपूर्ण काळ त्याचे जीवन पूर्णपणे लाइफसपोर्ट आणि फीडिंग ट्यूबवर अवलंबून राहिले आहे. वर्षानुवर्षे बिछान्यात पडून राहिल्याने त्याच्या पाठीला जखमा झाल्या आहेत. त्याच्या अवस्थेत सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नाही हे वास्तव अखेरीस स्वीकारून त्याच्या पालकांची त्याला सन्मानाने मृत्यू देण्यासाठीची न्यायालयीन धडपड सुरू झाली. त्यांची यासंदर्भातील याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर २०२४ मध्ये त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. प्रारंभी त्यांना दिलासा मिळाला नाही. परंतु गेल्या वर्षी त्यांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशात निष्क्रिय इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली होती. त्याआधारे हरीशच्या वैद्यकीय सुविधा काढून टाकण्यात याव्यात अशी मागणी त्याच्या पालकांनी केली. आता २०१८च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेले हे देशातील पहिले प्रकरण ठरले आहे. जगभरातील मोजक्या देशांमध्ये असलेले इच्छामरणाचे कायदे गुंतागुंतीचेच आहेत. असाध्यरित्या आजारी रुग्णांवरील उपचार थांबवण्याची प्रक्रिया कमी गुंतागुंतीची व्हावी याकरिता २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २०१८च्या निकालात काही बदल केले होते. तर सर्वोच्च न्यायालयाने आता दिलेल्या निर्णयामुळे २०१८च्या मार्गदर्शक तत्त्वांमधील काही अस्पष्ट बाबींवर अधिक स्पष्टता आली आहे. विशेषत: फीडिंग ट्यूबवर जगणाऱ्या रुग्णांच्या प्रकरणांबाबत. एखाद्या व्यक्तीला अनंत काळ अशा अवस्थेत ठेवणे मानवीय दृष्टिकोनातून योग्य नाही असे निरीक्षण न्यायालयाने आता नोंदवले आहे. दिल्लीतील एम्स रुग्णालयाला हरीश राणा याला दाखल करून घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असून वैद्यकीय देखरेखीखाली त्याचा लाइफ सपोर्ट टप्प्याटप्प्याने काढण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल. यासाठी विशेष योजना तयार करण्यात यावी व संपूर्ण प्रक्रियेदरम्यान रुग्णाची प्रतिष्ठा आणि सन्मान राखला जाईल याची काळजी घ्यावी असेही न्यायालयाने म्हटले आहे. हरीशच्या पालकांनी १३ वर्षे जो संयम आणि धैर्य दाखवले त्याचा तसेच त्यांच्या समर्पणाचा न्यायालयाने आपल्या निर्णयात विशेष उल्लेख केला. हा निर्णय केवळ कायद्याचा नसून प्रेम, वैद्यकीय विज्ञान आणि मानवी संवेदना यांचा संगम असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. थकलेल्या पालकांनी आपल्या मुलासाठी मिळवलेली ही वेदनामुक्ती आहे.**

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना १५ फेब्रुवारी २०१९च्या शासन निर्णयान्वये राज्यात राबविण्यात येत असून ही योजना राबविताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन कोणताही पात्र लाभार्थी प्रस्तुत योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या लाभापासून वंचित राहू नये याकरिता या योजनेची सुरळीतपणे अंमलबजावणी होण्यासाठी या योजनेच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत (PMKISAN) माहे डिसेंबर, २०२५ ते माहे मार्च २०२६ या कालावधीतील २२व्या हप्त्याचा देय लाभ देशातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ज्योती–बिश्नु आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र, खानापारा, गुवाहाटी, आसाम येथून इतर मान्यवरांच्या उपस्थितीत १३ मार्च २०२६ रोजी ऑनलाईन समारंभामध्ये वितरीत करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने १३ मार्च २०२६ हा दिवस PM-KISAN उत्सव दिवस म्हणून साजरा करून कार्यक्रमाचा प्रभाव आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी १३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून सर्व कार्यालये, पंचायत मुख्यालय, कृषी विज्ञान केंद्रे, मंडई आणि इतर योग्य ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याचे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, मा.मंत्री महोदय, संसद सदस्य आणि विधानसभा सदस्य इत्यादी यांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. याशिवाय http://pmindiawebcast.nic.in या लिंकद्वारे जिल्ह्यातील/तालुक्यातील लोकप्रतिनिधींना, गावातील शेतकऱ्यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर चला तर मग समजून घेऊया.. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेची सुधारित कार्यपध्दती..!

(१) अर्जदार व विभागनिहाय करावयाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:–प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत अर्जदार व विभागनिहाय खालीलप्रमाणे कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्यात :–

i) अर्जदार :– १) केंद्र शासनाच्या पोर्टलवर स्वयं नोंदणी करणे/तालुका कृषी अधिकाऱ्यांमार्फत/सामूहिक सुविधा केंद्रामार्फत (CSC) पोर्टलवर नोंदणी करावी. २) ई–केवायसी करावे. ३) बँक खाते आधार संलग्न करावे. ४) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

ii) कृषी विभाग :– १) स्वयंनोंदणीकृत लाभार्थींना मान्यता प्रदान करावी. २) तालुकास्तरावर लाभार्थींची पोर्टलवर नोंदणी करावी. ३) अपात्र लाभार्थींना पडताळणीअंती पोर्टलवर चिन्हांकित करावे. ४) डाटा दुरुस्ती करावी (भूमी अभिलेखाशी संबंधित माहिती वगळता). ५) लाभार्थीची भौतिक तपासणी करावी. ६) चुकीने अपात्र केलेल्या लाभार्थींना पात्र करावे. ७) मयत लाभार्थीची पोर्टलवर नोंद घ्यावी. ८) तक्रार निवारण करावे. ९) सामाजिक अंकेक्षण करावे. १०) योजनेची प्रचार प्रसिद्धी करावी. ११) योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक इतर कामकाज करावे.

iii)महसूल विभाग :– १) भूमी अभिलेख नोंदीनुसार अर्जदार योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र/अपात्र असल्याबाबत पोर्टलवर प्रमाणित करावे. २) भूमी अभिलेखाशी संबंधीत माहिती दुरुस्ती करावी. ३) लाभार्थ्यांच्या भूमी अभिलेख नोंदी अदययावत कराव्यात. ४) अपात्र लाभार्थीकडून लाभ परताचा वसूल करावा. ५)अपात्र लाभार्थीकडून केलेल्या वसूलीबाबत पोर्टलवर माहिती भरावी/अदययावत करावी. ६) अपात्र लाभार्थ्यांकडून वसूल केलेली रक्कम आयुक्त (कृषी) यांच्यामार्फत शासनाकडे जमा करावी. ७) योजनेंतर्गत भूमी अभिलेख, वसुली व महसूल यंत्रणेशी संबंधीत इतर कामे करावी.

iv) ग्रामविकास विभाग :–पीएम–किसान योजनेंतर्गतचा लाभार्थी मयत झाल्यास त्यास पोर्टलवर मयत म्हणून मार्क करण्यासाठी त्याची माहिती तालुका नोडल अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावी.

(२) पीएम–किसान पोर्टलवर नोंदणी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना मान्यता प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे :– नवीन अर्जदारांनी पीएम–किसान पोर्टलवर अर्ज दाखल करणे/नोंदणी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना पोर्टलवर मान्यता प्रदान करण्याबाबतची खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे :–

१) अर्जदारांनी केंद्र शासनाच्या पोर्टलवर स्वयं नोंदणी करावी अथवा तालुका कृषी अधिकाऱ्यांमार्फत अथवा सामूहिक सुविधा केंद्रा (CSC) मार्फत पोर्टलवर नोंदणी करावी. (सर्व आवश्यक माहिती व कागदपत्रांसह). २) पी.एम.किसान पोर्टलवर नोंदणी केलेल्या/तालुका स्तरावर थेट नोंदणी केलेल्या अर्जदारांची माहिती जमीनधारणेच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी तहसिलदार यांना तालुका कृषी अधिकारी पोर्टलवर उपलब्ध करुन देतील.३) तहसिलदार यांनी नोंदणीकृत अर्जदार यांच्या भूमी अभिलेखाशी संबंधित कागदपत्रांच्या (७/१२, ८अ, नोंदीचा फेरफार इ. कागदपत्रे) आधारे खातरजमा करून नोंदणीकृत शेतकरी भूमी अभिलेख नोंदीनुसार योजनेसाठी पात्र/अपात्र असल्याचे पोर्टलवर प्रमाणित करुन देतील. ४) भूमी अभिलेख नोंदीनुसार अर्जदाराची पात्रता निश्चित करण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत केली जाईल व त्या आधारे पुढील कार्यवाही कृषी विभागामार्फत केली जाईल.

५) तालुका/जिल्हा कृषी अधिकारी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत लाभार्थी योजनेच्या इतर निकषांप्रमाणे पात्र असल्याची खातरजमा करतील. ६) तहसीलदार यांनी नोंदविलेले अभिप्राय व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडील माहिती आधारे तालुका कृषी अधिकारी नोंदणीकृत शेतकरी हे पात्र असल्यास त्यांना मान्यता प्रदान करतील. तसेच अपात्र किंवा इतर कारणाने नाकारावयाचे असल्यास मान्यता नाकारण्याचे कारण देऊन पोर्टलवर मान्यता नाकारतील. ७) तालुकास्तरावर मान्यता प्रदान केलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्ह्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध झाल्यावर जिल्ह्यास्तरावरुन मान्यता प्रदान करणे/नाकारणे बाबतची कार्यवाही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येईल. ८) जिल्हास्तरावरून मान्यता प्रदान केलेल्या लाभार्थीची माहिती आयुक्त (कृषी) यांच्या स्तरावर राज्यस्तरावरील लॉगीनमध्ये उपलब्ध झाल्यावर राज्यस्तरावरून मान्यतेची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संनियंत्रण समित्या :– प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत १५ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध स्तरावर संनियंत्रण समित्या गठीत करण्यात येवून अंमलबजावणी प्रमुखाची नियुक्ती करण्यात आली आहे. या समित्यांच्या व अंमलबजावणी प्रमुखांच्या रचना आणि कार्य व जबाबदारीमध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आली आहेत :–

काही बदलांव्यतिरिक्त शासन निर्णय क्रमांक किसयो–२०१९/प्र.क्र.२०/भाग क्र.४/११जे दि.१५ फेब्रुवारी, २०१९ मधील इतर तरतूदी व केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना या योजनेची अंमलबजावणी करताना लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२३०६१५१६१४४४८९०१ असा आहे.

तरी रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा उपनिबंधक अमित शेडगे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी आणि या योजनेसाठी स्थापित जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हास्तरीय नोडल अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी केले आहे.

**–मनोज सानप,** जिल्हा माहिती अधिकारी, रायगड/ठाणे
तथा प्र.उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई



## बदलते तंत्रज्ञान

# मध्यपूर्वेतील युद्धामुळे डिजिटल यंत्रणेला धोका

होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील तेलाची जीवनरेखा म्हणून ओळखली जाते. दररोज लाखो बॅरल कच्चे तेल त्यातून जाते, पण हा समुद्री मार्ग फक्त तेलासाठी नाही तर जगातील इंटरनेटसाठी एक महत्त्वाचा डिजिटल कॉरिडॉरदेखील आहे. त्यामुळे युद्धाचा परिणाम केवळ तेलाच्या किमतींवरच नाही तर इंटरनेट, क्लाउड सेवा आणि जागतिक डेटा ट्रॅफिकवरही होऊ शकतो.



समुद्राखाली टाकलेल्या हजारो किलोमीटर लांबीच्या फायबर–ऑप्टिक केबल्स हे जगातील इंटरनेटचा खरा कणा आहेत. तज्ज्ञांच्या मते, जगातील सुमारे ९५ ते ९९ टक्के आंतरराष्ट्रीय डेटा ट्रॅफिक या समुद्राखालील केबल्समधून जातात. या केबल्समध्ये ईमेल, बँकिंग व्यवहार, क्लाउड डेटा आणि सरकारी संप्रेषणांपासून ते सर्व काही समावेश आहे. या केबल्सना झालेल्या नुकसानीमुळे इंटरनेटचा वेग कमी होणे, वेबसाइट डाउनटाइम किंवा क्लाउड सेवा व्यत्यय यासारख्या अडचणी येऊ शकतात.

आज जगात ४००हून अधिक मोठे पाणबुडी इंटरनेट केबल नेटवर्क आहेत, हे खंडांना जोडतात. हे केबल समुद्राच्या पृष्ठभागापासून काही किलोमीटर खाली ठेवलेले आहेत. जवळजवळ प्रकाशाच्या वेगाने डेटा प्रसारित करतात. मध्य पूर्व आणि आशियाला युरोपशी जोडणारे अनेक महत्त्वाचे केबल नेटवर्क पर्शियन आखात आणि त्याच्या आसपासच्या भागातून जातात. यामध्ये गल्फ ब्रिज इंटरनॅशनल, फाल्कॉन, युरोप इंडिया गेटवे आणि आय–एमई–डब्ल्यूई सारखे प्रमुख नेटवर्क समावेश आहेत, हे आशिया, आफ्रिका आणि युरोपला जोडतात.

जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल मार्गांपैकी एक, होर्मुझची सामुद्रधुनी या समुद्री मार्गांमधून जाते. म्हणूनच आता ते केवळ उर्जेसाठीच नाही तर डिजिटल पायाभूत सुविधांसाठीदेखील एक अडथळा मानले जाते.

तंत्रज्ञान तज्ज्ञांच्या मते, भारतातून युरोप किंवा अमेरिकेला जाणारे अनेक डेटा मार्ग मध्य पूर्वेतून जातात. भारताच्या पश्चिमेकडील इंटरनेट ट्रॅफिकपैकी सुमारे एक तृतीयांश या प्रदेशातून जातो. जर या क्षेत्रातील सागरी हालचाली विस्कळीत झाल्या, केबल्स खराब झाल्या किंवा डेटा मार्ग ब्लॉक झाले तर भारतातील इंटरनेट गती आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीवर परिणाम होऊ शकतो, मात्र या कारणास्तव भारतात पूर्णपणे ब्लॅकआउट किंवा इंटरनेट बंद होण्याची शक्यता नाही.

# प्राच्यविद्या संशोधक डॉ. वासुदेव मिराशी

## निमित्त

डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांची ओळख आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय प्राच्यविद्यासंशोधक व भारतविद्यातज्ज्ञ अशी राहिली आहे. त्यांचा जन्म १३ मार्च १८९६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कुवळे (सध्या जि.सिंधुदुर्ग) येथे मध्यमवर्गीय कुटुंबात विष्णू व राधाबाई या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे तसेच पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी मॅट्रिक (१९१०), बीए (१९१४) आणि एमए (१९१६) या परीक्षांत प्रथमवर्ग पटकाविला. सुरुवातीस त्यांनी मुंबईतील शासकीय एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एलएल. बी. पदवी प्राप्त केली तसेच मुंबई विद्यापीठात प्रबंध सादर केला (१९२२).



पुढे डॉ. वासुदेव मिराशी यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजात (१९४२–४७; विद्यमान नागपूर महाविद्यालय) व नंतर अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज (१९४७–५०; विद्यमान विदर्भ महाविद्यालय) येथे संस्कृत या विषयाचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. नागपूर विद्यापीठात (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) त्यांनी सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले (१९५८–६६). काही काळ तेथील पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. नागपूरमधील विदर्भ संशोधन मंडळ या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. या माध्यमातून त्यांनी इंग्रजीतील संशोधन मराठीत लिहून ते विदर्भ संशोधन मंडळाच्या नियतकालिकातून प्रकाशित केले.

प्राचीन शिलालेख, नाणी आणि अभिजात प्राचीन संस्कृत साहित्य ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे. त्यांनी वाकाटकांच्या ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा मागोवा घेऊन सध्याचे रामटेक म्हणजेच मेघदूतातील रामगिरी होय, असा सिद्धांत मांडला (१९३४). हा सिद्धांत त्यांनी मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक या नावाने प्रकाशित केला (१९५८). खुद्द रामटेकला रामगिरीस्वामींचा उल्लेख असलेला वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिचा शिलालेख एका वाकाटककालीन मंदिरात १९८०च्या दशकात सापडला तो या सिद्धांताला पूरक ठरला. त्याचप्रमाणे अजिंठ्याच्या लेणे क्रमांक १६ येथील वाकाटक लेखाचे वाचन करून नंदिवर्धन (विद्यमान रामटेकजवळील नगरधन) व वत्सगुल्म (विद्यमान वाशिम जिल्ह्याचे ठिकाण) या ठिकाणी वाकाटक राजवंशाच्या दोन शाखा होत्या हे सिद्ध करून त्यांनी वाकाटक वंशावळ निश्चित केली.

शिलालेख व ताम्रपट यांच्या अचूक वाचनाबरोबरच नाणकशास्त्रातही त्यांनी अजोड कामगिरी केली. संस्कृत साहित्यातील त्यांचे विशेष योगदान त्यांच्या कालिदास (१९३४), भवभूती (१९६८), हर्षचरितसार आणि लघुकौमुदी या पुस्तकांतून दिसून होते. याशिवाय त्यांनी संशोधन मुक्तावलिमधून संशोधनात्मक लेख लिहिले (सर १–९ : १९५४–५९, मराठी). कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् या ग्रंथमालेचे मिराशी हे पहिले भारतीय संपादक होत. या नियतकालिकेतील परंपरेतूनच त्यांनी प्राचीन राजवंशांवरील ग्रंथ लिहिले. नागपूर येथे त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पोटातील आग, आंबट ढेकर शांत करण्याचे उपाय..

उन्हाळा सुरू झाला की, शरीरात वेगवेगळे बदल जाणवू लागतात. घाम जास्त जातो, शरीराचं तापमान वाढतं, डिहायड्रेशनचा धोका वाढतो, सोबतच पोटात जळजळ होण्याचा त्रासही वाढतो. या दिवसांमध्ये पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्या होत असल्याने भूक मरते. त्यामुळे फक्त थंड पाणी पिण्याची किंवा थंड काहीतरी खाण्याची इच्छा अधिक होते. जास्त मसालेदार किंवा तिखट काही खाल्ल्याने पोटात आणि छातीत जळजळ होण्याची तक्रार या दिवसात बरेच लोक करतात. काही लोकांचं तर जळजळ होण्यासोबतच डोकंही दुखू लागतं. पण छातीत किंवा पोटात जळजळ होण्याचं कारण केवळ आहार नसून आम्ल आणि पित्त दोष हे आहेत.



आयुर्वेदानुसार पोटात किंवा छातीत जळजळ ही शरीरात पित्त आणि आम्ल वाढल्याची लक्षणं असू शकतात. जेव्हा पित्त अधिक वाढतं तेव्हा वेगवेगळी लक्षणं दिसू लागतात. जसे की, पोटात जळजळ, आंबट ढेकर, डोकं जड वाटणे किंवा डोळ्यांमध्ये जळजळ. अशा स्थितीत आयुर्वेदात पित्त शांत करण्याच्या काही पेयांबाबत उल्लेख आहे. जसे की, शतावरी, शंख भस्म आणि ज्येष्ठमध. यांचा संतुलित वापर केल्यास शरीरातील अग्नि शांत होते आणि पित्त संतुलित करण्यास मदत मिळते.

या दिवसांमध्ये ॲसिडिटीचा त्रास वाढण्याची वेगवेगळी कारणं असू शकतात. जसे की, रात्री उशिरा जेवण करणे, अधिक मसालेदार आणि तळलेले पदार्थ खाणे, जास्त चहा किंवा कॉफी पिणे, जास्त स्ट्रेस आणि जास्त वेळ उपाशीपोटी राहिल्याने आम्ल वाढतं. यासाठी शतावरी आणि शंखभस्म घेतलं जाऊ शकतं. दोन्ही गोष्टी समान प्रमाणात मिक्स करून घेतल्यास पोट थंड राहतं आणि आम्ल कमी होतं.

पोटातील जळजळ जर शांत करायची असेल तर ज्येष्ठमध आणि खडी साखरही फायदेशीर ठरते. दोन्हींचं मिश्रण कोमट दुधात किंवा पाण्यात टाकून घेऊ शकता. याने पोटातील उष्णता शांत होते, छाती आणि घशातील जळजळ सुद्धा कमी होते.

आम्ल–पित्ताची समस्या टाळायची असेल तर सूर्य मावळण्याआधी जेवण करावं. जेवण केल्यावर लगेच बसू नका हलका वॉक करा, याने अन्न चांगल्या प्रकारे पचन होण्यास मदत मिळेल आणि आंबट ढेकर येण्याचा त्रास होऊ शकतो. उन्हाळ्यात पोटाला थंड ठेवेल असा आहार घ्या, जसे की, खिचडी आणि दलिया.

# स्त्री केवळ घर सांभाळणारी नाही तर समाज घडवणारी शक्ती

## ■ मुरुडच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचे प्रतिपादन



**मुरुड : प्रतिनिधी**

आजची स्त्री सर्व क्षेत्रात यशस्वीपणे पुढे जात आहे.आणि स्वतः चा ठसा उमटोला आहे.महिलांचा सशक्तीकरण म्हणजे समान संधी देणे नाही तिला समान हक्क सन्मान दिला पाहिजे. स्वत:चे निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे.महिलांचे आरोग्य खुप महत्वाचा आहे. प्रत्येक स्त्री घरातल्या ची आरोग्याची काळजी घेत असताना स्वतः ला विसरून जाते आणि आपलं आरोग्य मागे ठेवते असं न करता स्त्रीनी स्वतः चे आरोग्य कडे लक्ष दिले पाहिजे एकदा स्त्री ने ठरविले तर ती कुटुंबा सोबत संपूर्ण देशाला प्रगतीच्या दिशेने नेऊ शकते.स्त्री ही केवळ घर सांभाळणारी नाही तर समाज घडवणारी शक्ती आहे .असे प्रतिपादन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी मुरुड जंजिरा नगरपरिषद महिला व बालकल्याण समिती अंतर्गत महिला जागतिक दिनाच्या कार्यक्रमावेळी बोलत होत्या.

यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत,मुख्याधिकारी सचिन बच्छाव, महिला व बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, उपसभापती दिप्ती एरंडे,बांधकाम सभापती यास्मिन कादिरी, नगरसेविका प्रिती चौलकर, प्रमिला माळी, प्रांजली मकु,देवायानी गुरव, श्रध्दा अपराध,राज्ययुवा पुरस्कार प्रतिम सुतार,सिनेनाट्य अभिनेता प्रतिक पानकर, नगरसेवक पांडुरंग आरेकर, नितिन आबुर्ले,रुपेश रणदिवे, श्रीकांत खोत,मनिष विरुकुड आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कष्टाची दखल घेत शहरातील महिलांना मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने श्रीफळ शाल व सन्मानचिन्ह देऊन हिरकणी पुरस्काराने गौरविण्यात आले.

लकी ड्रॉ च्या मानकरी कोळीवाड्यातील मिना भगत ठरल्या त्यांना पैठणी साडी नगराध्यक्षा यांच्या शुभ हस्ते देण्यात आली तसेच स्व संरक्षणाच्या अध्यापक शोनल किशोर मेहरोळे व नगरपरिषदेचे लिपिक दिप्ती एरंडे व विविध महिलांना हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मौजे – खानाव, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७९/४/अ | ०–३६–८० (पोट खराब्यासह) पैकी ०–१६–०० | ३.३४ | १) हर्षवर्धन गौरीशंकर घोरपडे<br>२) कांचनमाला गौरीशंकर घोरपडे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १२/०३/२०२६.

सही/–
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

# कर्जत स्टेशनवरून वृद्धाचे अपहरण करून लुटमार; महिलेसह दोघांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात एक धक्कादायक गुन्हा उघडकीस आला असून एका ६१ वर्षीय वृद्धाचे अपहरण करून त्याच्या कडील सोन्याचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम लुटल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी सुनिल दयाराम गजघाटे वय वर्ष ६१, रा. नागपूर यांना आरोपी आदिती ढोके हिने कर्जत रेल्वे स्टेशन येथे बोलावले. त्यानंतर तिचे साथीदार सुशील जाधव व गणेश प्रधान यांच्या मदतीने फिर्यादीचे अपहरण करून, सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी फिर्यादीला पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये बसवून वेगवेगळ्या ठिकाणी फिरवले. त्यानंतर आरोपी आदिती ढोके राहत असलेल्या, फ्लॅटमध्ये फिर्यादीला डांबून ठेवण्यात आले.

दरम्यान आरोपींनी फिर्यादीला मारहाण करत चॉपरचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी कडील सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतल्याची घटना घडली आहे. या घटनेत आरोपींनी फिर्यादीकडून दीड तोळ्याची सोन्याची चैन, दोन सोन्याच्या अंगठ्या, १५ हजार रुपये रोख व दोन मोबाईल फोन असा एकूण २ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज लुटल्याचे समोर आले आहे. तसेच आरोपींनी फिर्यादीकडून एटीएम कार्डचा पिन नंबर जबरदस्तीने घेऊन त्यांच्या बँक खात्यातून पैसे काढले, तसेच क्रेडिट कार्डद्वारे खरेदी करून आर्थिक नुकसान केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

घटना ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ९ मार्च सकाळी ६.३० या दरम्यान घडली असून १० मार्च रोजी पहाटे २.०३ वाजता कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मुरूडमध्ये शॉर्टसर्किटमुळे घराला आग

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात कोळीवाडा परिसरात राहणारे राकेश बाबुराव कुलाबकर यांच्या निवासस्थानी सायंकाळी ठीक ६ वाजून ३० मिनिटाच्या अंतरावर शॉक सर्किट झाल्याने सर्वप्रथम त्यांच्या घरातील टीव्ही ने पेट घेतला व बघता बघता आग सर्वत्र पसरू लागली काही मिनिटात घरातील टीव्ही जळून खाक झाला व आग वरती वरती सरकू लागली.घरातील गृहिणीने सदरची बाब लक्षात येताच आजू बाजूंच्या लोकांना मदतीसाठी बोलावले शेजारील लोकांची तातडीने मदत केल्याने आग आटोक्यात येऊन तिथेच थांबली.त्यामुळे या घरातील खूप मोठे नुकसान टळले आहे.

या आगीमध्ये टिव्ही सह मासे पकडण्याची जाळी व नवीन आणलेला रोप जळून खाक झाला आहे.सदरची घटना समजताच मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे हे घटनास्थळी पोहचून येथील कुटुंबाला धीर दिला.मुरुड अग्निशामक दलास पाचारण करण्यात आले होते परंतु आग आटोक्यात आल्याने अग्निशामक दल माघारी फिरले.

नगरसेविका प्रांजली मकू व नगरसेवक विजय पाटील यांनी सुद्धा घटनास्थळी तातडीने भेट देऊन सदरील कुटुंबाला धीर दिला. आग लवकर लक्षात आल्याने व शेजारील लोकांची त्वरित मदत केल्याने मोठे नुकसान टळले आहे.


## ड्रायव्हर पाहिजे

**फॉर्च्युनर कार साठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी–विंग, साक्षी पार्क–२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई–४१०२०६

संपर्क
मोबाईल : ८१०८४००२१४
Email : ekanathpatil4141@gmail.com


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी **मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खाली नमुद करण्यात आलेल्या जमिन मिळकती हया मुळ कब्जेदार /मालक **(१) सौ. मंदाकिनी सदानंद झुंझारराव, २) श्रीमती. निर्मला दशरथ देशमुख, ३) श्री. अजय दशरथ देशमुख, ४) श्री. सुरेश वामनराव देशमुख, ७) श्री. अशोक वामनराव देशमुख, ६) श्रीमती. सुमन नारायण देशमुख, ७) सौ. प्रतिभा रामराव शिंदे, ७) सौ. वर्षा नितीन मोहिते, ८) श्रीमती. नलिनी चंद्रसेन देशमुख, ९) श्री. संकेत चंद्रसेन देशमुख** यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| २५०/३/अ | ० - ०९ - ४० | ० - ०० - ५० | ० - ०९ - ९० | १.६२ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतीसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित कब्जेदार/मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **सात (०७) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या सात (०७) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरच्या जमिन मिळकती हया कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

दिनांक : १२/०३/२०२६

सही/–
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. विवांत सिगनेचर एल.एल.पी. तर्फे भागिदार १) सौ. वीराबेन गोविंद पटेल २) श्री. यश गोविंद पटेल ३) श्री. अक्षय रतीलाल पटेल ४) श्री. देवराज हरखा बंगरी ५) श्री. अंकेश वेलजी वावीया ६) श्री. सवजी हरखा बंगरी पत्ता. १३०१, बालाजी रेसिडेन्सी, भुखंड नं. ५२/५३, सेक्टर १५, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड यांनी, खालील वर्णनाचा भुखंड १) सौ. रंजना महादेव मढवी २) सौ. सुनिता गजानन भोईर ३) श्री. संकेत गजानन भोईर ४) श्री. सनी गजानन भोईर ५) सौ. नंदिनी नंदकुमार भोपी सर्व रा. मौजे उलवे, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडुन त्यांचे सर्व हक्क व हितसंबंधासहीत त्रिपक्षिय कराराद्वारे हस्तांतरीत करून घेत आहेत.

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | २२ | ६एन | ६४९.१७ |

प्राप्त परिस्थितीत वरील वर्णन केलेल्या भुखंडावर कोणत्याही व्यक्तिचे कोणत्याही प्रकारचे करार गहाण, दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, भाडेकरार, साठेकरार, अखत्यार, एम.ओ.यु. अगर तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तिनी अगर संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क, हितसंबंधांचे स्वरूप विशद करुन, कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणत्याही व्यक्तिकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क अगर हितसंबध नाही, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे हस्तांतरणाचा व्यवहार पुर्ण करतील व आलेल्या तकारी, दावे अगर हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपुर्वक सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/३/२०२६

सही/–
**ॲड. कुणाल कमळाकर म्हात्रे**
**कार्या:– मंजुषा को. ऑप. सोसायटी, ब्लॉक क्र.४. तळमजला, हॉटेल गार्डनचे मागे, स्टेटस हॉटेलचे जवळ, पनवेल– रायगड.**
**मो.नं.८१६९७४५५५१**

# जिल्हा परिषद उपाध्यक्षपदी मधुकर पाटील यांच्या निवडीने रोह्यात उत्साह आणि जल्लोष

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक गुरुवार पार पडली. या मध्ये रोहा तालुक्यातील भुवनेश्वर जिल्हा परिषद गटाचे विजयी उमेदवार मधुकर मारुती पाटील यांची जिल्हा परिषद उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा होताच रोहा शहर व तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि मधुकर पाटील यांच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष साजरा केला.



रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. विशेषतः त्यांची पत्नी व माजी जिल्हा परिषद सदस्या मनीषा मधुकर पाटील यांच्यासह कुटुंबीय भावूक झाल्याचे दिसून आले.या निवडीबद्दल खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजयराव मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी सभापती अनिल भगत, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी मधुकर पाटील यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, रोहा शहर व तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आणि घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. मधुकर पाटील यांच्या निवडीमुळे रोहा तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्यासंघर्षाच्या काळात रोहा माणगाव तालुक्यातील अनेक मातब्बर नेतेमंडळी त्यांच्या पासून दूर गेलेली, परंतु मधुकर पाटील हे एकमेव वरिष्ठ नेते त्यावेळी तटकरेंच्या सोबत राहिले, त्यांनी तटकरेंची साथ सोडली नाही, तटकरे कुटुंबीयांसोबत कायम प्रामाणिक आणि निष्ठावंत राहिलेले मधुकर पाटिल हे पक्षामध्येही जिल्ह्यात ज्येष्ठ असल्याने तटकरेंनी त्यांच्या नावाला पसंती दिल्याचे बोलले जात आहे.

# वीज बिल भरण्याचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

महावितरण उपविभागातर्फे मुरुड उपविभागा अंतर्गत असणाऱ्या सर्व शासकीय कार्यालये, शाळा, कॉलेज अंगणवाडी या सर्वांना थकीत वीज बिले त्वरित भरण्यात यावीत. असे आवाहन मुरुड महावितरणचे उप कार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी केले आहे

मार्च अखेर असल्याने थकीत बिल मार्च महिन्याअगोदर भरणे खूप आवश्यक आहे. सध्या मुरुड तालुक्यात सुरळीत वीज पुरवठा सुरू असून महावितरणचे सर्व कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत.

तरी मुरुड तालुक्यातील सर्व वीज ग्राहकांनी वीज बिल भरून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी **मौजे बंबावी, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खाली नमुद करण्यात आलेल्या जमिन मिळकती हया मुळ कब्जेदार/मालक **श्री. विश्वास सदाशिव देशमुख** यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ६३ | ० - ०६ - ६० | ० - ०० - ०० | ० - ०६ - ६० | १.४४ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतीसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित कब्जेदार/मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **सात (०७) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या सात (०७) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरच्या जमिन मिळकती हया कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

दिनांक : १२/०३/२०२६

सही/–
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, **मौजे वाजे, ता. पनवेल, जि, रायगड** येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**मौजे वाजे, ता. पनवेल, जि, रायगड.**

| भोगवटादाराचे नाव/हिस्सेदार | गट/सर्व्हे भूमापन. नं. | हिस्सा/उपविभाग नं. | क्षेत्र हे–आर.चौ.मी. | आकार रू=पैसे |
|---|---|---|---|---|
| १) सौ. मिना सुरेश पाटील, २) सौ. नंदा भगवान खानावकर, | १५० | १ | ०–८५–१० जिरायत | १=३७ |
| | | पो. ख. | ०–११–८० | |
| | | एकुण | ०–९६–९० एकूण यापैकी ०–०४–३५ हे.आर.पॉ., जिरायत, पो.ख. ०–११–८० हे.आर.पॉ. एकूण क्षेत्र ०–१६–१५ हे.आर. पॉ., म्हणजेच १६. १५ गुंठे एवढया क्षेत्राचा विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार | ०=०७ |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ११/०३/२०२६.

सही/–
**(सतिश बाळाराम गवते)**
**वकील.**

पत्ता : ऑफिस नं. ६४, तळमजला, सेक्टर–१, महालक्ष्मी शॉपिंग सेंटर, महालक्ष्मी नगर, मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१० २०६, फोन नं. ९१३७५००४५१.

## कर्मवीर भाऊराव पाटील माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन

**पो. आवरे, ता. उरण, जि. रायगड. पिन. ४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार ग्रामस्थ यांस जाहीर निविदेद्वारे कळविण्यास येते की, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, जि. रायगड यांसकडून सन २०२५–२६ अंतर्गत कामाचे खालील प्रमाणे कामांसाठी मोहरबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकी रक्कम | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | क्रीडांगण समपातळीत करणे | ७,९८०००/– | २०/०३/२०२६ | १० दिवस |

**अटी व शर्ती**

१) सदर कामाचे अंदाजपत्रक शाळेच्या कार्यालयात पहावयास मिळेल.
२) अंतिम तारखेस दिनांक २०/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजल्यानंतर घेतली जाणार नाही.
३) प्राप्त निविदा २०/०३/२०२६ सकाळी ११.०० वाजता शाळेच्या कार्यालयात उपस्थित प्राचार्य यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
४) सविस्तर अटी व शर्ती करीता शाळेच्या कार्यालयाकडे संपर्क करावा.
५) ठेकेदाराने जी.एस.टी. प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) कोणतीही १ अथवा अनेक निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार शाळेने राखून ठेवला आहे.
७) पॅन कार्ड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

सही/–
**मुख्याध्यापक**
**कर्मवीर भाऊराव पाटील माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन, ता. उरण**

# वाढत्या उष्णतेमुळे मोहोर करपला

## बागायतदार चिंतेत ▌ आंबा बागांची कृषी अधिकाऱ्यांकडून पाहणी

**उरण : प्रतिनिधी**

निसर्गाच्या अनिश्चितेमुळे रायगडसह उरण तालुक्यातील आंबापिक धोक्यात आले असून शेतकरी चिंतेत सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यात तांत्रिक मार्गदर्शन व उपाययोजना करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञांनी तालुक्यातील आंबा बागायतींना भेटी देत असतानाच, सहयोगी प्रा.डॉ. व्ही.पी. दामोदर, कनिष्ठ कीटकनाशक शास्त्रज्ञ डॉ. व्ही पी सावंत, पीक संरक्षण विषय शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर, उरण तालुका कृषी अधिकारी ऋतुजा सुळ, कृषी पर्यवेक्षिका बरकूल, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर, कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत, कृषी सहाय्यक अधिकारी भजनावळे यांनी उरण तालुक्यातील चिरनेर गावातील आंबा बागायतदारांच्या बागांना भेटी देऊन, त्यांच्या आंबा बागांची पाहणी केली.

पाहणीनुसार परतीचा पाऊस लांबल्याचा आंबा पिकावर परिणाम झाला असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशानुसार तालुक्यातील आंबा बागायतदारांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळावी असे आवाहन येथील शेतकऱ्यांनी केले आहे. दरम्यान तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात अचानक बदल झाल्यामुळे आंबा पिकांच्या बागायतीवर विपरीत परिणाम झाला आहे. यंदा परतीचा पाऊस फार लांबल्याने आंब्याच्या झाडांना मोहर उशिरा आला. त्यातच पाऊस पडत असल्यामुळे, ऑक्टोबर महिन्यात अपेक्षित उष्णता न मिळाल्याने



आंबाच्या झाडांना मोहर नीट फुलला नाही. डिसेंबर महिन्यात योग्य प्रमाणात थंडी पडली.आंबा झाडांना चांगला मोहरही आला होता.

बागायतदारांनाही समाधानकारक उत्पादन अपेक्षित होते, मात्र त्यानंतर जानेवारीअखेर पासून हवामानातील बदलामुळे परागीकणावर परिणाम झाला. यातच काही ठिकाणच्या आंबा बागायतींमध्ये पुन्हा मोहर दिसून आला. मात्र अचानक वाढलेल्या तापमानामुळे झाडांवरील शिल्लक मोहर करपून गेला आहे. याआधी आलेली फळधारणा देखील कमी झाली. लहान फळे गळत असल्यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. आणि आता तर दिवसा उन्हाचा कडाका वाढू लागल्याने वाढत्या उष्णतेमुळे आंबा मोहर काळवंडास सुरुवात झाली आहे

> **कृषी विभागाने नुसती पाहणी करून पुरेसे नाही, तर नुकसानग्रस्त आंबा बागायतदारांच्या बागांचे पंचनामे करून पंचनाम्याचा अहवाल शासनाकडे पाठवावा. आणि आंबा बागायतदार शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी. तेव्हाच शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल.**
>
> **–कृष्णा म्हात्रे,** शेतकरी, चिरनेर

# पाम बीच मार्गावरील अनधिकृत लोखंडी कमानी धोकादायक

## आमदार मंदा म्हात्रे यांनी मांडली लक्षवेधी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिका मालकीच्या उद्यान, मैदाने, नाले तसेच आरक्षित असलेल्या भूखंडावर भूखंड माफिया यांनी सर्रासपणे अनधिकृत बांधकामे उभारली आहेत या संदर्भात मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार मंदा म्हात्रे यांनी लक्षवेधी मार्फत शासनाचे लक्ष वेधले.

सदर लक्षवेधीमध्ये आमदार मंदा म्हात्रे यांनी विशेषत: पाम बीच मार्गावरील बेकायदा लावण्यात आलेल्या जाहिरात डिजिटल फलक शासनाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, पामबीच मार्गाच्या अलीकडे किंवा पलीकडे कोणतेही सरंचना उभारणी करायची असेल तर महाराष्ट्र सागर किनारा नियामक प्राधिकरणाची (एमसीझेडएमए) परवानगी घेणे, वाहतूक पोलिसांची परवानगी घेणे तसेच इतर संबंधित प्राधिकरणाची



परवानगी घेणे बंधनकारक असते, परंतु कोणत्याही परवानगी न घेता सदर पामबीच व मोराज सर्कल अथवा इतरत्र ठिकाणी जाहिरातींसाठी लोखंडी सांगाडे उभारण्याची कामे सुरू आहेत. अशा उभारण्यात येणाऱ्या तेजस्वी प्रकाश, सतत बदलणारे व्हिडिओ किंवा एनिमेशन यामुळे काही सेकंद चालकाचे लक्ष रस्त्यावरून हटू शकते, आणि वेगाने चालणाऱ्या वाहनांमध्ये ते धोकादायक ठरू शकते. पामबीच येथे मार्गावर लावण्यात येणाऱ्या एलईडी जाहिरात फलकामुळे तेजस्वी प्रकाश, सतत बदलणारे दृश्य यामुळे वाहनचालकाचे लक्ष विचलित होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### नगरविकास मंत्र्यांचे निवेदन

लक्षवेधी वर नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले की, सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस ६२८ भूखंड हस्तांतरित केले असून यापैकी २९ आरक्षित भूखंडावर विविध प्रकारची अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे निदर्शनास आल्याचे असल्याचे नगरविकासमंत्री यांनी त्यांच्या उत्तरामध्ये नमूद केले आहे. तसेच नवी मुंबई मनपा क्षेत्रातील अनेक बेकायदेशीर /अनधिकृत बांधकामे मनपा सदस्यांनी केल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्याचे नगरविकास मंत्री यांनी स्पष्ट केले आहे. तसेच येत्या ८ दिवसात पामबीच येथे अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या बांधकामांवर कारवाई करणार असल्याचे सांगितले.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार मंदा म्हात्रेंनी महिलांसाठी उठवला आवाज



**नवी मुंबई : बातमीदार**

नारी शक्तीच्या प्रेरणास्थानी असलेल्या आई जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची या पुण्यभूमीत महिला सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे असे आमदार मंदा म्हात्रे यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात माननीय अध्यक्षांच्या प्रस्तावावर चर्चा केली.

महिला सक्षमीकरण व सबलीकरण म्हणजे महिलांना समाजात समान हक्क, संधी, स्वातंत्र्य आणि निर्णय घेण्याची क्षमता मिळवून द्यावी असेही प्रतिपादन आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केले. यामुळे महिलांना स्वतःचे जीवन, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक स्थान याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेता येतील. तसेच महिलांना शिक्षण, आर्थिक साधने, कायदेशीर हक्क आणि सामाजिक आदर देऊन त्यांना स्वावलंबी व सक्षम बनविण्याची प्रक्रिया शासनाने केली पाहिजे.

महिला सक्षमीकरणाचे महत्त्व म्हणजे समानता: पुरुष आणि महिलांमध्ये समान हक्क निर्माण करणे. तसेच कुटुंब व समाजाचा विकासामध्ये शिक्षित आणि सक्षम महिला कुटुंबाच्या प्रगतीत मोठा वाटा उचलणे. महिलांना स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय घेण्याची ताकद देणे तसेच शिक्षणाचा प्रसार रोजगार व आर्थिक स्वावलंबन कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे तसेच राजकारण व सामाजिक क्षेत्रात सहभाग महिलांचा सहभाग वाढवणे भारत सरकारने महिलांच्या विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. उदाहरणार्थ : बेटी बचाओ बेटी पढाओ योजनासुकन्या समृद्धी योजना उज्ज्वला योजना तसेच महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नाही तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.

महिलांना समान संधी आणि आदर दिल्यास समाज अधिक प्रगत आणि समतोल होऊ शकतो. या संबंधी प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# उरणमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

उरण महिला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था उरण यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त उरण महिला मेळावा २०२६चे आयोजन करण्यात आले. मोठ्या उत्साहात सदर महिला दिन साजरा करण्यात आला. यात उरणमधील सर्व मान्यवर महिला संस्था व मंडळांचा सहभागहोता असे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले यंदाचे २०वे वर्षे आहे असे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाची संकल्पना क्षण वेचूया आनंदाचे असे होते.

महिला मेळावा रविवारी (दि.८) सायंकाळी ५ वाजता उरण नगरपरिषद महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नाना धर्माधिकारी कन्या शाळा क्र.१ व २ पेन्शनर पार्क समोर उरण येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या लेखिका सावनी गोडबोले आदी उपस्थित होत्या.



महिलांनी सकारात्मक विचार ठेवूनच वाटचाल केली पाहिजे चांगेल विचार यशस्वी होण्यास मदत करत असतात, महिलांनी प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे. महिलांनी महिलांना सर्व प्रकारे मदत केली पाहिजे मदतीनेच सर्वांची प्रगती होते असे विचार कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्या लेखिका तथा सामाजिक कार्यकर्त्या सावनी गोडबोले यांनी मांडले.

प्रमुख पाहुण्या लेखिका तथा सामाजिक कार्यकर्त्या सावनी गोडबोले यांचे स्वागत अध्यक्षा गौरी देशपांडे यांनी पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व भेट वस्तू देवून स्वागत केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या उद्योजिका स्वाती दुरुगकर, अध्यात्मिक क्षेत्र संगीता साळुंखे व जलतरण पटू अनिता म्हात्रे या महिलांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्हे, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास संस्था कार्यकारिणी सदस्यांचे सहकार्य मिळाले.

# नेरूळमध्ये चौकात सिग्नल बसवण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ४ आणि ६ परिसरातील सुश्रुषा हॉस्पीटल आणि वेलनेस हॉस्पीटल समोरील चौकात वाढत्या वाहतुकीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या चौकातून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये–जा होत असते, मात्र येथे वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल यंत्रणा नसल्यामुळे वाहनचालक व नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या ठिकाणी रुग्णालय असल्यामुळे रुग्णवाहिका, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची सतत वर्दळ असते. त्यामुळे वाहतुकीचे योग्य नियोजन नसल्यास अपघात होण्याची शक्यता वाढत असल्याची चिंता स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याबाबत शिवसेनेचे पदाधिकारी महादेव पवार यांनी नवी मुंबई पोलिस वाहतूक शाखा यांच्याकडे निवेदन देऊन सदर चौकात तात्काळ वाहतूक सिग्नल बसवण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने लवकरात लवकर योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



# नवनाथ ठाकूर यांचा प्रामाणिकपणा

**उरण : प्रतिनिधी**

उरण येथील कोप्रोली गावात प्रामाणिकपणा आणि माणुसकीचा उत्तम आदर्श घालून देणारी घटना समोर आली आहे. साईबाबांचे निस्सीम भक्त असलेले नवनाथ नारायण ठाकूर यांनी सापडलेले तब्बल १७ तोळ्यांचे सोन्याचे गंठण आणि रोख रक्कम कोणत्याही प्रकारचे बक्षीस किंवा मानधन न घेता मूळ मालकाकडे सुपूर्द केली.

मिळालेल्या माहितीनुसार, कोप्रोली येथील राजू शांताराम पाटील यांच्या पत्नीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मौल्यवान ऐवज रविवारी



रात्रीच्या सुमारास हरवला होता. अचानक घडलेल्या या घटनेमुळे पाटील कुटुंबीय चिंतेत होते. यावेळी हा मौल्यवान ऐवज नवनाथ ठाकूर यांच्या हाती लागला, मात्र लोभाला बळी न पडता त्यांनी प्रामाणिकतेचा मार्ग निवडत १७ तोळ्यांचे सोन्याचे गंठण व रोख रक्कम राजू पाटील यांच्या स्वाधीन केली.

विशेष म्हणजे, या कृतीसाठी त्यांनी कोणत्याही प्रकारचे बक्षीस किंवा मानधन स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. नवनाथ ठाकूर यांच्या या उदात्त कृतीमुळे सर्वच स्थरातून त्यांचे कौतुक होत आहे, तर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राजू पाटील व त्यांच्या कुटुंबीयांनी नवनाथ ठाकूर यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

दरम्यान, आजच्या काळात अशा प्रामाणिक कृती समाजासाठी एक प्रेरणादायी ठरत असून, आपल्यातील धार्मिकता आणि साईबाबांवरील निसीम भक्तीच्या सुरेल विश्वासाने नवनाथ ठाकूर यांनी आपल्या वर्तनातून प्रामाणिकपणाचा उत्तम संदेश देऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

# अबोली महिला रिक्षाचालक संघटनेतर्फे महिला दिन

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रातील पहिली महिला रिक्षा चालकांची संघटना म्हणून ओळख मिळवलेल्या अबोली महिला रिक्षाचालक संघटनेतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांच्या कार्याचा महिलांकडून विशेष गौरव करण्यात आला.

सुमारे आठ वर्षांपूर्वी महिला दिनाचे औचित्य साधून संतोष भगत यांनी अबोली महिला रिक्षा चालक संघटनेची स्थापना केली. महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि समाजात सन्मानाने उभे राहण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. आज नवी मुंबई, ठाणे आणि पनवेल परिसरात संघटनेचे जाळे विस्तारले



आहे. दरवर्षी संघटनेचा वर्धापन दिन आणि जागतिक महिला दिन असा दुग्धशर्करा योग साजरा केला जातो.


यावर्षीही कोपरखैरणे येथे संघटनेच्या महिला सदस्यांना संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांच्या वतीने साडीवाटप करण्यात आले. त्यानंतर पनवेल येथेही संघटनेतील महिला रिक्षाचालकांना साडी वाटप करून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला उपाध्यक्ष सुलोचना भगत, कोपरखैरणे उपाध्यक्ष दिशा वाघमारे तसेच पनवेल येथील कार्यक्रमासाठी खजिनदार ललिता राऊत, पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला सदस्य उपस्थित होत्या.

# पीरवाडी ते जेएनपीए सागरी अंतर केगावच्या चिमुरड्याने पोहून केले पार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

केगाव येथील मानस जयेश पाटील या सहा वर्षीय चिमुरड्यांने पिरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतर चार तास ४९ मिनिटे आणि ५० सेकंदात पोहून पार केले. चिमुरड्याच्या धाडसाचे परिसरातून कौतुक केले जात आहे. उरण तालुक्यातील केगाव येथील जयेश पाटील यांचा सहा वर्षीय मानस हा मुलगा आहे.

प्रशिक्षक संतोष पाटील यांनी दिलेल्या प्रशिक्षणानंतर पोहण्यात मानस तरबेज



झाल्याची खात्री पटल्यानंतर मानसला पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतरासाठी पोहण्यासाठी सज्ज केले.

यासाठी त्यांनी ६ मार्चच्या तारखेचा दिवसही नक्की केला. या मोहिमेसाठी येथील जीटीआय कंटेनर टर्मिनलनेही मदतीसाठी पुढे केला. मानस पिरवाडी बीचवरून समुद्रात झेपावला. पिरवाडी बीच नागाव, केगाव ते जेएनपीए बंदर या सागरी अंतरादरम्यान क्षणाक्षणाला उलटसुलट वाहाणाऱ्या प्रवाहामुळे अत्यंत धोकादायक मानला जातो.

सहा वर्षीय चिमुरड्याने पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतर ४ तास ४९ मिनिटे आणि ५० सेकंदात पार केले.

# एमएनएम विद्यालयात गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एम एन एम विद्यालयात प्राथमिक व माध्यमिक विभागाचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा तसेच वार्षिक बक्षीस वितरण समारंभ जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे सदस्य अँड राहुल घरत, पनवेल पंचायत समिती सदस्या सौ जिज्ञासा कोळी यांच्या मुख्य उपस्थितीत घेण्यात आला.

वार्षिक बक्षीस वितरण समारंभाची सुरुवात पंचायत समिती सदस्या सौ जिज्ञासा कोळी व ॲड. राहुल घरत, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सायली वडवलकर यांनी दीप प्रज्वलनाने केली. शालेय व सहशालेय उपक्रम, विविध शालेय, आंतरशालेय स्पर्धांमध्ये तसेच श्रीरामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पण निमित्त विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी



केलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरणप्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

वरील प्रसंगी पंचायत समिती सदस्य सौ जिज्ञासा कोळी यांनी प्राथमिक विभागातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांचे कौतुक केले शालेय अभ्यास तसेच सहशालेय उपक्रम यामध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सहभागाबद्दल तसेच यशस्वी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ॲड श्री राहुल घरत यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा उंचावत असलेला आलेखाबद्दल समाधान व्यक्त केले तसेच बक्षीस पत्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सायली वडवलकर यांनी स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कलागुण, अभिव्यक्ती, कौशल्य , सृजनशीलता, सर्जनशील विचार क्षमता, नेतृत्व गुण , कार्य कुशलता वृद्धिंगत होण्यास मदत होते तसेच अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभाग घ्यावा असे नमूद केले. किशोर कोळी, शाळेच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले. सदरहू कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल म्हात्रे, कोमल पाटील , कुमारी किंजल योगी, कुमारी रोहिणी शिरसाट यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख, शर्मिन काझी, वंदना जाधव , पूजा कुमारी,यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# आंबेनळी घाटातून कार दरीत कोसळली

## पोलादपुरातील बावली टोक येथे अपघात; पाच प्रवासी जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर–महाबळेश्वर–वाई–सुरूर राज्यमार्गावरील पोलादपूर तालुक्यातील बावली टोक येथे आंबेनळी घाटात मारुती वॅगन आर कार सुमारे ३०० ते ४०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना गुरुवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात कारमधील पाच प्रवासी जखमी झाले. अपघातस्थळी महाबळेश्वर व प्रतापगड येथील रेस्क्यू टीमने धाव घेत सर्व जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णावाहिकेद्वारे महाबळेश्वरला दाखल केले आहे.



सातारा जिल्ह्यातील लाखवड गावचे काही ग्रामस्थ मुंबईहून गावी परतताना पहाटेच्या सुमारास आंबेनळी घाटातील बावली टोक–चिरेखिंड दरम्यान वाहनाचा ताबा सुटल्याने वॅगन आर कार रस्त्याच्या कडेला जाऊन खोल दरीत कोसळली. अपघातानंतर वाहन थेट सुमारे ३०० ते ४०० फूट खोल दरीत जाऊन अडकले. या कार अपघातात अजय सुनील संकपाळ, तुकाराम संकपाळ, सुनील संकपाळ, पार्थ संकपाळ आणि संगीता संकपाळ हे प्रवासी जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी महाबळेश्वर येथील रुग्णालयात हलवण्यात आले.

आंबेनळी घाटातील घटनास्थळी अत्यंत धोकादायक परिस्थितीत दरीमध्ये उतरून बचावकार्य करणाऱ्या रेस्क्यू टिमच्या सदस्यांनी केलेल्या धाडसाचे कौतुक होत आहे. प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीमचे सदस्य संकेत सावंत व ऋषिकेश जाधव याना या अपघाताची माहिती मिळताच त्यांनी इतर सदस्यांना संपर्क साधून रेस्क्यूवर्कला सुरवात केली.

प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीमचे सदस्य अजित जाधव, अनिकेत वागदरे, संकेत सावंत, ऋषिकेश जाधव यांनी घटना स्थळी धाव घेत महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांना देखील अपघाताची माहिती दिली. स्पॉटवर पोहोचल्यानंतर दोरीच्या मदतीने रेस्क्यूटीमचे सदस्य दरीमध्ये उतरले. जी व्यक्ती जास्त जखमी आहे त्याला स्ट्रेचरवरून दोरीच्या सहाय्याने घाट रस्त्यावर काढण्यात आले. याप्रकारे उर्वरित सर्व जखमीना सुखरूप वर काढून कारमधील सर्व ५ जखमी प्रवाशांना महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

या बचाव मोहिमेत प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीमचे अनिकेत वागदरे, अजित जाधव, ऋषिकेश जाधव, आशिष बिरामने, संकेत सावंत तसेच महाबळेश्वर ट्रेकर्सचे सुनीलबाबा भाटिया, अमित कोळी, सुजित कोळी, सोमनाथ वागदरे यांच्या मदतीसाठी वाडा कुंभरोशी व चिरेखिंड ग्रामस्थ तसेच पोलादपूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी उपस्थित होते.

# मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर कार जळून खाक



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर बुधवारी सायंकाळी एका डस्टर कारला भीषण आग लागली असून या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवरून डस्टर कार मुंबईहुन पुण्याकडे जात असताना ती बोरघाटात आली असता अचानक कारला शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. चालकाने तत्परतेने कार रस्त्याच्या बाजूला थांबवून कारमधून बाहेर पडल्याने चालक बचावला आहे

या आगीची माहिती मिळताच बोरघाट पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल होत अग्निशमन दलाला बोलावून आग विझवण्याचे शर्थिने प्रयत्न केले मात्र या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे. यावेळी पुणे लेन वरील वाहतूक काही काळ थांबविण्यात आली होती.

# उतेखोल केंद्राची गुणवत्ता विकास स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील केंद्र उतेखोलच्या केंद्रस्तरीय गुणवत्ता विकास स्पर्धा शाळा विकास कॉलनी येथे उत्साहात झाली. सदर स्पर्धेत केंद्रातील १३ जिल्हा परिषद शाळांनी सहभाग घेतला होता. यशस्वी व स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना उतेखोल केंद्रप्रमुख यांच्याकडून बक्षिसे देण्यात आली.



या गुणवत्ता विकास स्पर्धेचे उदघाटन केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्याहस्ते करण्यात आले. सदर स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ माणगाव तहसीलचे निवासी नायब तहसीलदार अरविंद घेमुड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पाढे पाठांतर स्पर्धा, स्पेलिंग रायटिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पाढे पाठांतर स्पर्धा प्रथम क्रमांक शाळा खर्डी बु.,द्वितीय क्रमांक शाळा गिरिजनवाडी, तृतीय क्रमांक शाळा कळमजे, इंग्रजी स्पेलिंग पाठांतर प्रथम बामणोली शाळा,द्वितीय गिरीजनवाडी शाळा,तृतीय विकास कॉलनी शाळा, प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रथम क्रमांक शाळा विकास कॉलनी, द्वितीय क्रमांक शाळा उतेखोल, तृतीय क्रमांक शाळा चव्हाणवाडी या शाळांनी सुयश संपादन केले. या स्पर्धांचे परीक्षक म्हणून केशर सानप व निलम गायकवाड, अमित पानसरे, अजित शिंदे, सुदर्शन वाघोरकर,अस्मिता खडतर, वैशाली पवार, शिक्षक वेवल, शितल नागे, नंदिनी वाले, लक्ष्मी भिंगारे, पूर्वा येलवे यांनी काम पाहिले. या स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र उतेखोलच्या सर्वच शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# कन्यारत्न सन्मान उपक्रमाचा वर्धापन दिन साजरा; ‘मायेची चिट्ठी–आशीर्वाद पत्र’ उपक्रमाचा शुभारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सहज सेवा फाउंडेशन व सहज महिला फाउंडेशन यांच्या वतीने कन्या रत्न सन्मान हा सामाजिक उपक्रम सुरू करण्यात आला होता. समाजात कन्या जन्माचा सन्मान व्हावा, स्त्री शक्तीचा गौरव व्हावा आणि सकारात्मक सामाजिक संदेश पोहोचावा या उद्देशाने हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.



या उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात १०३ मातांचा सन्मान करून कन्या जन्माचा आनंद समाजासमोर साजरा करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त या कार्यात मोलाचे सहकार्य करणाऱ्या कमल पाटील, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आणि श्री कलेक्शन, खोपोली यांचा विशेष सन्मान करून त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

याच वर्धापन दिनानिमित्त मायेची चिट्ठी–आशीर्वाद पत्र या नवीन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. खालापूर नगर परिषदेच्या पहिल्या नगराध्यक्ष तसेच सहज सेवा फाउंडेशन व सहज महिला फाउंडेशनच्या मार्गदर्शिका शिवानी जंगम यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या उपक्रमाअंतर्गत ज्या कन्येचा वाढदिवस असेल त्या कन्येला संस्थेमार्फत मायेचे आशीर्वादरूपी पत्र पाठविण्यात येणार असून समाजात कन्या जन्माचा सन्मान आणि स्त्री शक्तीचा गौरव बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या उपक्रमात मदत करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे,सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्कप्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुकाप्रमुख मोहन केदार, मार्गदर्शक अशपाक लोगडे, सल्लागार नरेंद्र हार्डीकर तसेच सहज महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा निलम विलास पाटील, उपक्रम प्रमुख सागरीका जांभळे यांच्या हस्ते करण्यात आला.

# रातवड विद्यालयात महिला पालक मेळावा



**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे सखी सावित्री समिती व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक ९ मार्महिला पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याचा विषय सुजाण पालकत्व असा होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून अनिता सुनील मोरे (एम.ए. मराठी, समुपदेशक) यांनी उपस्थित माता–भगिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या काळात मुलांच्या संगोपनात आई–वडिलांची भूमिका, मुलांशी भावनिक संवाद कसा ठेवावा, तसेच कुटुंबातील नातेसंबंध दृढ ठेवण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांच्या मानसिक विकासासाठी पालकांनी सकारात्मक वातावरण निर्माण करणे, मुलांना योग्य दिशा देणे आणि त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नाते ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले.

या मेळाव्याला विद्यालयातील महिला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमामुळे पालकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून उपस्थितांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक व सखी सावित्री समिती यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. अजित शेडगे, सौ. शिल्पा पालकर, डॉ. शारदा निवाते यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले.महिला दिनाच्या निमित्ताने उपस्थित पालकांनी गाणी कविता अभंग व आपले विचार व्यक्त केले अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये महिला पालक समुपदेशन कार्यशाळा संपन्न झाली.महिला दिनाच्या निमित्ताने आगळ्यावेगळ्या स्वरूपात राबविलेल्या या उपक्रमाचे छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉक्टर निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील आदी मान्यवरांनी कौतुक केले आहे.

# शेणवई शाळेत महिलादिनी माता पालकांचा सन्मान

**रोहा : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा शेणवई येथे शाळेतील आजी – माजी मातापालक, आशासेविका, अंगणवाडी सेविका, स्वयंपाकीताई, अंगणवाडी मदतनीस यांच्या हळदीकुंकू व सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून विद्येची देवता सरस्वती मातेची पूजा करण्यात आली. त्यानंतर राजमाता जिजामाता तसेच सावित्रीबाई फुलेंच्या यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली . या कार्यक्रमात शाळेतील आजी माजी मातापालक, अंगणवाडी सेविका, स्वयंपाकीताई, अंगणवाडी मदतनीस व आशासेविका आशा समाजातील विविध घटकांचा छोटेखानी कार्यक्रमात हळदीकुंकू व भेटवस्तू देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित माता पालक आणि शाळेतील शिक्षिका यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी एस.एम.सी उपाध्यक्ष सौ. प्रेरणा झावरे, सदस्यास्वप्नाली देशमुख, सुवर्णा झावरे, मंदा सानप, रेखा मढवी, श्रुतिका झावरे, तसेच माता पालक निकिता साखीलकर, अक्षता शिंदे,. सुवर्णा भोनगे, अनुजा सानप. नीलिमा साखीलकर, दीपिका सानप, सपना वाघमारे, संगीता वाघमारे, प्रमिला वाघमारे, सौ. अनिता जाधव, आशा सेविकानीलिमा देशमुख, स्नेहल शिंदे मॅडम, अंगणवाडी मदतनीसरजनी देशमुख, स्वयंपाकीताई रोहिणी देशमुख, त्याच बरोबर गावातील इतर माता पालक व मान्यवर महिला मोठया संखेने उपस्थित होत्या.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील जेष्ठ शिक्षिका शिल्पा सुर्वे मॅडम, दया गायकवाड मॅडम, सारिका गांगड मॅडम, ी सरिता कांबळे मॅडम, अनिता देशमुख मॅडम, यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुखविजय वेळे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गायकवाड मॅडम यांनी तर आभार सुर्वे मॅडम यांनी मानले.

# पेणमधील आंबिवली फाट्याजवळ अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील आंबिवली फाट्याजवळ डंपर आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

सोमवार ९ मार्च रोजी आरोपी रा.परासी, ता.इचाग, जि.हजारीबाग, राज्य झारखंड हा त्याच्या ताब्यातील डंपर क्रमांक एम एच ४६ बीएफ ४५९० हा सकाळी ९ :५० च्या सुमारास पेण बाजूकडे अतिवेगाने, हयगयीने व बेदरकारपणे गाडी चालवित येत होता. त्याच बाजूने टीव्हीएस ज्युपिटर एमएच ०६ बी वाय ७५७७ वरील चालक कृष्णा धर्मा पाटील (वय ५२) रा. बळवली, पेण हे जात असताना आंबिवली फाट्याजवळ दुचाकी डंपरच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबत दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






# पळसगाव वाडी येथे शिवजयंती उत्साहात



**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळ, पळसगाव वाडी यांच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सव दि. ०६ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात रायगड रोडवर शिवभक्तांसाठी चहा, पाणी व बिस्कीट वाटपाने झाली. रात्री ११ ते सकाळी ६ पर्यंत हजारो शिवभक्तांनी या सेवेत सहभाग घेतला. सकाळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

ग्रामस्थ मंडळाच्या सहकार्याने हा उत्सव यशस्वीरीत्या पार पडला. मंडळाचे संस्थापक उमेश पवार, सचिव प्रतिक पवार तसेच उपाध्यक्ष नागेश चाळके व ग्रामस्थांनी उत्सवाचे उत्तम व्यवस्थापन केले. पळसगाव खुर्द येथील मिनाताई वरणकर व पळसगाव बुद्रुक येथील पोलीस पाटील राकेश गजानन पवार यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मुरूड नगर परिषदेचा अर्थसंकल्प सादर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषदेमार्फत आर्थिक वर्ष २०२६–२०२७करिता शिलकीचा व विकासाभिमुख असा अर्थसंकल्प विशेष सभेपुढे सादर करण्यात आला. नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी विशेष सभेत हा अर्थसंकल्प मांडला.



शहराच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून तयार करण्यात आलेला हा अर्थसंकल्प शिलकीचा आणि संतुलित असून पायाभूत सुविधा, स्वच्छता, पर्यटन विकास आणि नागरी सुविधा यावर विशेष भर देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सदर अर्थसंकल्प तयार करताना मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली लेखा विभागातील लेखापाल कपिल वेहेले व श्वेता विरकुड यांनी विशेष परिश्रम घेतले. अर्थसंकल्प तयार करताना नगर परिषद क्षेत्राच्या विकासाच्या गरजा, महसुली वाढीच्या शक्यता तसेच नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा दृष्टीकोन ठेवण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले.

या विशेष सभेस नगराध्यक्ष आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष वीरेंद्र भगत, तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक व नगर परिषदेचे अधिकारी उपस्थित होते. सभेत अर्थसंकल्पावरील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि शहराच्या विकासासाठी सहकार्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

सादर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प शहराच्या संतुलित व शाश्वत विकासाला चालना देणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सभेस सदस्य उपस्थित होते.

# पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव

## बांगलादेशने उडवला धुव्वा; वनडे मालिकेत १-०ने आघाडी

**ढाका : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत बांगलादेशने खेळण्यास नकार दिला होता. त्यामुळे बांगलादेशच्या जागी स्कॉटलँडला खेळण्याची संधी दिली गेली होती, तर पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत खेळवले गेले होते, पण पाकिस्तानला सुपर ८ फेरीतून बाहेर पडावे लागले. ही स्पर्धा झाल्यानंतर आता पाकिस्तानचा संघ सध्या बांगलादेश दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये तीन वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा सुपर फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे.




प्रथम फलंदाजीसाठी करण्यासाठी आलेला पाकिस्तानचा डाव अवघ्या ११४ धावांवर आटोपला. या सामन्यात सलामीला आलेल्या जोडीने ४१ धावा जोडल्या होत्या. त्यानंतर पुढील ७३ धावांत संपूर्ण संघाचा डाव आटोपला. या धावांचा पाठलाग करताना बांगलादेशने आठ गडी राखून विजय मिळवला. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशने पाकिस्तानवर एकतर्फी विजयाची नोंद केली आणि मालिकेत १-०ने आघाडी घेतली आहे.

या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानकडून साहिबजादा फरहान आणि माज सदाकतची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. पाकिस्तानला चांगली सुरुवात तर मिळाली होती. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६० चेंडूत ४१ धावा जोडल्या. त्यानंतर पाकिस्तानचा डाव पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला.

बांगलादेशकडून गोलंदाजी करताना वेगवान गोलंदाज नाहिद राणाच्या गोलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला. नाहिदने आधी पाकिस्तानचा सर्वात यशस्वी फलंदाज साहिबजादा फरहानला माघारी धाडले. त्यानंतर हुसेन, माद सदाकत, मोहम्मद रिझवान आणि सलमान अली आघाला पॅव्हेलियनची वाट दाखवली. अवघ्या ६९ धावांवर पाकिस्तानचा निम्मा संघ तंबूत परतला.

आधी नाहिज राणा आणि त्यानंतर मेहदी हसनने पाकिस्तानच्या फलंदाजांची पळता भूई थोडी केली. अवघ्या ८१ धावांवर संघातील आठ फलंदाज तंबूत परतले होते. त्यानंतर ८२ धावसंख्येवर पाकिस्तानला नववा धक्का बसला. पाकिस्तानचे १०० धावांपर्यंत पोहचणेही कठिण झाले होते. शेवटी फलंदाजी करताना फहीम अशरफने ३७ धावांची खेळी केली आणि संघाची धावसंख्या १०० धावांपर्यंत पोहचवली. शेवटी अशरफ बाद झाला आणि पाकिस्तानचा डाव अवघ्या ११४ धावांवर आटोपला. यानंतर बांगलादेशने विजयाची औपचारिकता पूर्ण केली. पाच बळी टिपून पाकिस्तानची दाणादाण उडवणारा नाहिद राणा सामनावीराचा मानकरी ठरला.

# सचिनच्या निवृत्तीबाबत मोठा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटचा 'देव' अशी चाहत्यांची भावना असणारा महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या निवृत्तीबाबत एक खळबळजनक खुलासा समोर आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने सचिनला त्याच्या पर्यायाचा शोध सुरू असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते व त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच मास्टर ब्लास्टरने निवृत्तीची घोषणा केली, अशी माहिती माजी मुख्य निवडकर्ते संदीप पाटील यांनी एका पॉडकास्टमध्ये दिली.

संदीप पाटील यांनी सांगितले की, २०१२च्या नागपूर कसोटीच्या शेवटच्या दिवशी मी आणि सहकारी निवडकर्ते राजेंद्रसिंग हंस यांनी सचिनची भेट घेतली. मी त्याच्याशी आगामी वाटचालीबद्दल चर्चा केली. आम्ही त्याला कधीही संघातून काढले नाही, पण आम्ही चर्चा नक्कीच केली होती.



पाटील यांनी सचिनला सांगितले की, निवड समिती आता त्याच्या पर्यायाचा विचार करत आहे, तेव्हा सचिनला मोठा धक्का बसला. सचिनने आश्चर्याने विचारले होते की, का? तुम्ही गंभीर आहात का? त्यावर पाटील यांनी होकारार्थी उत्तर दिले. सुरुवातीला मला खेळ सुरू ठेवायचा आहे, असे सांगणाऱ्या सचिनने अवघ्या एका आठवड्यात पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेपूर्वी एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर एका वर्षाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मालिकेनंतर त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला कायमचा निरोप दिला.

संदीप पाटील म्हणाले की, सचिनला निवृत्तीचा निरोप देणे हा एक कठीण निर्णय होता, पण त्यानंतर अजिंक्य रहाणेसारखा खेळाडू संघात आला. सचिनने आपल्या २४ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३४ हजारपेक्षा जास्त धावा केल्या आणि २०० कसोटी सामने खेळणारा तो जगातील पहिला खेळाडू ठरला.

### 'धोनीने युवराजला डच्चू देण्यास कधीही सांगितले नाही'

भारताचा माजी अष्टपैलू क्रिकेटर युवराज सिंगच्या गच्छंतीसाठी वडील योगराज सिंग यांनी अनेकदा याला महेंद्रसिंह धोनीला जबाबदार धरले आहे. या आरोपाबाबत संदीप पाटील यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, निवड समितीच्या बैठका असो, दौरा किंवा सामन्यादरम्यान कधीही धोनीने युवराजला वगळण्याबाबत वाच्यता केली नाही.

# क्रिकेट स्पर्धेत आमडोशी संघ विजेता

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरातील वांगणी येथील श्री मरीआई क्रिकेट क्लबच्या वतीने श्री मरीआई क्रीडांगण, चामुटी शेत येथे आयोजित ओव्हर आर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्री माणकेश्वर आमडोशी संघाने एसकेपी कानसई संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले.



शिवतेज आमडोशी व जेबीसी पळस संघांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेतील मालिकावीर पुरस्कार आमडोशी संघाचा हरेश भोसले, उत्कृष्ट फलंदाज अजित ढाणे (कानसई), उत्कृष्ट गोलंदाज प्रथमेश दळवी (आमडोशी), सामनावीर निलेश खांडेकर (आमडोशी), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक निषाद भालेकर (पळस) यांनाही गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या निमित्ताने ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून श्रुती ठाकूर यांच्या हस्ते वांगणी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच मालिका भिसे, माजी उपसरपंच रसिका तेलंगे तसेच नम्रता भिसे, अर्चना तेलंगे, रसिका भिसे, कविता ठाकूर, रुपाली तेलंगे, कल्पना दंत आदी महिलांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेस रोहा पंचायत समितीचे माजी सदस्य व वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय भोसले, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र तेलंगे, मोरेश्वर तेलंगे, कमलाकर तेलंगे, मधुकर तेलंगे, विनायक तेलंगे, कांचन ठाकूर, अंकुश तेलंगे, नरेंद्र भिसे, वैभव भिसे, दिलीप तेलंगे, विलास भिसे, राकेश भिसे, विकास ठाकूर, तेजस तेलंगे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. स्पर्धेसाठी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.

# हार्दिक पांड्याविरोधात पोलिसांमध्ये तक्रार

**पुणे : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष सुरू असतानाच, स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या एका गंभीर वादात अडकला आहे. विजयानंतर मैदानावर सेलिब्रेशन करताना भारतीय राष्ट्रध्वजाचा (तिरंग्याचा) अवमान केल्याचा ठपका ठेवत हार्दिक पांड्याविरोधात पुणे आणि बंगळुरूमध्ये कायदेशीर तक्रार दाखल करण्यात आली आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताने विश्वचषक उंचावल्यानंतर खेळाडूंनी मैदानावर तिरंग्यासह धावत जल्लोष केला. यावेळी हार्दिक पांड्याने आपल्या मैत्रिणीसोबत (माहीका शर्मा) सेलिब्रेशन करताना तिरंगा आपल्या कंबरेखाली किंवा शरीराभोवती अशा पद्धतीने गुंडाळला होता, ज्यामुळे ध्वजाचा अवमान झाला, असा आरोप तक्रारदाराने केला आहे.

# नवी मुंबईत आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या वतीने आमदार चषक २०२६ भव्य ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धा शुक्रवार (दि.१३)पासून करावे गाव येथील कै. गणपतशेठ तांडेल मैदानावर रंगणार आहे. या स्पर्धेत बेलापूर विधानसभा क्षेत्रातील एकूण २४ संघांनी सहभाग घेतला आहे.



स्थानिक क्रीडाप्रेमी तरुणांना आपले उपजत क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. नवी मुंबईतील खेळाडूंना प्रोत्साहन मिळून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली छाप निर्माण करावी यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचेही त्या म्हणाल्या.

या तीन दिवसीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक २,५०,००१ रुपये, द्वितीय १,२५,००१ रु., तृतीय ७५,००१ रु. व तिन्ही विजेत्यांना आकर्षक चषक तसेच उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आणि यष्टिरक्षक यांना एलईडी टीव्ही व चषक, याशिवाय संपूर्ण स्पर्धेतील उत्कृष्ट मालिकावीर खेळाडूला मोटरसायकल व चषक देण्यात येणार आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि. १५ मार्च रोजी सायंकाळी होणार आहे. स्पर्धेला क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.















अलिबाग : रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे मंगेश रामचंद्र वाकडीकर आणि उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर मारुती पाटील बिनविरोध निवडून आले. राजिपच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा अध्यक्ष निवडून आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रविशेठ पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदींनी जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर आणि उपाध्यक्ष मधुकर पाटील यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com